

# श्री साईलीला

डसेंबर  कि. ५० न. पैसे.  १९५९

र्डी संस्थानचें अधिकृत मासिक



# श्री साई वाक्सुधा

तसाच लागाबांधा असल्याशिवाय कोणीहि कोणाकडे जात नाहीं. माणसास काय, परंतु पशुपक्षांनाहि कधीं हडहड करूं नये. आल्यागेल्याचा नेहमीं आदर करावा. त्यांच्याशीं सौजन्यानें वागावें. तहानेल्यांची तहान भागवावी; भुकेले-ल्यांची भूक भागवावी. जे उघड्यावर पडले असतील त्यांना ओसरी द्यावी. श्रीहरीला प्रसन्न करून घेण्याचे हे मार्ग आहेत. दुसऱ्याचे शंभर बोल शांतपणें ऐकून घ्या. त्याला कटु उत्तर कोणत्याहि परिस्थितींत देऊं नका. कुणाला पैसे देण्याचें मनांत नसेल तर नका देऊं; परंतु कुत्र्याप्रमाणें त्याच्यावर भुंकूं नका. दुनिया इकडची तिकडे झाली तरी गडबडूं नका. आपलें मन श्रीहरीचरणीं स्थीर ठेवा.

—श्रीसाईसच्चरित

---


[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ३६ वें ] डिसेंबर १९५९ [ अंक ९ वा

: संपादक :

नागेश आत्माराम सावंत

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. २५१२७४

: कार्यालय :

ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १

# प्रिय वाचक,

शिरडी येथे श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं येणाऱ्या स्त्री पुरुष भक्तांनीं तेथील वास्तव्यांत आपआपल्या परीने शक्य तेवढी सावधगिरी बाळगावी ही सूचना वारंवार करावी लागत आहे. संस्थान समितीतर्फे भक्तांच्या सुखसोयीसाठीं जें जें करणें जरूर आहे तें तें करण्यांत दक्षता बाळगण्यांत येत असते; परंतु रोजच्या रोज नाना ठिकाणाहून नाना वृत्तीचे लोक येतात; सारेच केवळ भक्तिभावानें येतात असें नाहीं. त्यांत स्वार्थी व आपमतलबी भावाने येणारीही कांहीं मंडळी असते. त्यांच्यावर पाळत ठेवणे व त्यांना ओळखणे कठीण असतें. प्रत्येकाने आपापल्या पुरती खबरदारी घेण्याचें धोरण स्वीकारल्यास चोऱ्या व फसवणूक होणार नाहीं. असें आढळून आलें आहे कीं, मनमाड, चाळीसगांव वगैरे स्टेशनांवरून गाडींत प्रवेश करून आपमतलबी लोक यात्रेकरूंवर पाळत ठेवतात, त्यांना भूलथापा देतात व येनकेन प्रकारेण लुबाडतात. शिरडींत दर्शनासाठीं येणाऱ्यांस मध्यस्थाची किंवा मार्गदर्शनाची जरूरी भासूं नये, सर्व व्यवहार सुरळीतपणे पार पाडतां यावे यासाठीं सारी रेखीव व्यवस्था करून ठेवण्यांत आली आहे. असें असतांही कांहीं लोक स्वार्थी लोकांच्या भूलथापांस बळी पडून विनाकारण स्वतःचें नुकसान करून घेत असतात.

× × ×

शिरडींत आल्यानंतर प्रथम आपल्या जवळील सामानसुमानाचा बंदोबस्त नीट लावावा. संस्थानच्या नोकर मंडळीचें जरूर तें सहकार्य घ्यावें. कोणाही तिऱ्हाईतावर विसंबून राहूं नये. शिरडींत आज काय किंवा श्रीसाईबाबांच्या हयातींत काय, दर्शनाच्या निमित्तानें नानावृत्तीचे लोक येतात व येत असत. यात्रेंत येणारे व भाग घेणारे सारेच लोक भक्तिभावाने आलेले असतात असें नाहीं. बाबांना या गोष्टीची पूर्ण जाणीव होती. एकदां श्री. दामू अण्णा कासार एका यात्रेंतील गर्दीला उद्देशून म्हणाले, 'बाबा! यंदा यात्रा फार मोठी दिसते!' त्यावर बाबा म्हणाले होते, 'यात्रा फार मोठी जमली आहे हें ठीक आहे; परतु त्या यात्रेंत मला ओळखणारे व खऱ्याखुऱ्या भक्तिभावाने आलेले फार थोडे! आंब्याच्या झाडाला मोहोर खूप येतो; परंतु साऱ्याच फुलांना कांहीं फळे येत नाहींत. फळें फार थोडी येतात व बाकीचा मोहोर गळून पडतो. जगांत हें असे चालायचेच. 'जे माझ्यावर प्रेम करतात, जे मला ओळखतात, त्यांना मीहि ओळखतों. व त्यांच्यावर प्रेम करतों.' कै. दामू अण्णांचे चिरंजीव श्री. नानासाहेब रासने यांनीं सांगितलेली ही आठवण सर्व भक्तांनीं लक्षांत बाळगण्यासारखी आहे.

× × ×

असें आढळून आलें आहे कीं, शिरडीस येणारी कांहीं भक्त मंडळी स्नानास निघाली असतां, संडासाकडे गेली असतां किंवा इतर वेळीं आपल्या जवळचें घड्याळ, बटणे किंवा मौल्यवान् वस्तु बाहेर उघड्यावर ठेऊन जातात; परत जातांना त्या वस्तु घेण्याची आठवणही त्यांना रहात नाहीं, आणि मग त्या वस्तू हरवल्याचें आढळून येतें ! तरी अशा प्रकारचा गबाळेपणा कोणीही करूं नये. शक्य तेवढी व जास्तीत जास्त खबरदारी घेण्यांत आली असतां कोणावरहि पश्चात्ताप करण्याची पाळी येणार नाहीं. शिरडींत येणाऱ्या कोणाचीहि कोणत्याहि बाबतींत फसवणूक होऊं नये या हेतूनें हा इषारा नम्रतापूर्वक देण्यांत येत आहे.

× × ×

धर्मकृत्यांसाठीं पैसे पाठविणाऱ्यांनीं व्यवस्थापक-संस्थान समितीच्याच नांवावर पाठवावे अशी विनंती करण्यांत येत आहे. रीतसर पावती मिळून इच्छेप्रमाणे धर्मकृत्य पार पाडिलें जाईल याबद्दल खात्री बाळगावी.

श्रीसाईबाबांचा प्रचारक किंवा शिष्य कोणीहि नाहीं. शिरडींत किंवा इतरत्र कांहीं स्वार्थी लोक श्रीसाईबाबांसारखा पेहेराव करून मी त्यांचा शिष्य आहें किंवा त्यांच्यासंबंधीं मला अनेक गोष्टी माहित आहेत असें सांगून भोळ्या भाबड्या भक्तांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असतात. कुठून तरी पैसे उकळायचे हेंच त्यांचें धोरण असतें. तरी भक्तजनांनीं अशा स्वार्थी लोकांपासून निरंतर सावध रहावे. आज भक्तिभाव, श्रद्धा यांची जरुरी फार आहे. ते अमोलिक गुण आहेत; परंतु त्यांत भोळसटपणा किंवा अंध श्रद्धाळूपणा नसावा. त्यामुळें आपली नाहक फसवणूक होते व ती करण्यासाठीं स्वार्थी लोक टपलेले असतात, या गोष्टीची जाणीव प्रत्येकानें बाळगली पाहिजे; तरच या जगांत आपला निभाव लागेल.

× × ×

साखळी पत्रांचा सुळसुळाट थांबलेला नाहीं. तो सध्यांही चालू आहे हें पाहून मनस्वी दुःख होतें. अमूक नाहीं केलें तर तमुक होईल, मोठा घातपात होईल, असा धाक घालणारीं पत्रें आपल्या माहितीच्या लोकांना पाठवावयाचीं, त्यांत श्रीसाईबाबांच्या नांवाचा उल्लेख करून तुम्हीं अशीं वीस पत्रे तुमच्या ओळखीच्या लोकांस नाहीं पाठविलीं तर तुमच्यावर संकट परंपरा कोसळेल, असा धाक घालावयाचा व या मूर्खपणाच्या मार्गाचा अवलंब करण्यास इतरांस भाग पाडावयाचें हा अत्यंत हीन व निरुद्योगी मार्ग होय. यांत फायदा जर कोणाचा होत असेल तर तो टपालखात्याचाच होय. बाकी बाब नुकसानीची ! या बाबतींत अनेक वार लिहूनही त्याचा व्हावा तसा उपयोग झालेला दिसत नाहीं. श्रीसाईलीलेच्या वाचकांनीं आपापल्या कक्षेंतील लोकांस याबाबातींत सावध करावें अशी अपेक्षा आहे.

× × ×

श्रीसाईलीलेकडे लेख व कविता पाठविणाऱ्यांसंबंधीं दोन प्रेमाचे शब्द लिहिणें जरूर आहे. श्रीसाईलीलेसाठीं लेख व कविता पाठविणाऱ्यांचे आम्हीं आभारी आहोंत. या मासिकाच्या धोरणांत बसणारे लेख व कविता यांना सवडीप्रमाणें जरूर प्रसिद्धी दिली जाईल; परंतु आपण कोणत्याही विषयावर कशाही तऱ्हेनें लिहून पाठविलेला लेख हमखास प्रसिद्ध झालाच पाहिजे असा आग्रह नसावा. जें प्रसिद्ध होण्याच्या लायकीचे व वाचकांच्या ज्ञानांत भर घालणारें आहे त्याला यथावकाश प्रसिद्धी मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं, हें निश्चित समजावें. भलतेसलते गैरसमज करून घेऊन लेखकांनीं व कवींनीं संपादकावर रागावूं नये; संपादकाला सर्वांचें समाधान करावयाचें असतें व मासिकाचें धोरण सांभाळावयाचें असतें! तसेंच अंक सुंदर व्हावा यासाठीं झटावयाचें असतें याची जाणीव कृपा करून सर्वांनीं बाळगावी व जितकें म्हणून सहकार्य देता येईल तेवढें द्यावें अशी विनंती आहे.

× × ×

श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांचें व कवितांचें स्वरूप वाचकांस समजून आलें असेलच. लेख कागदाच्या एका बाजूस लिहिलेला असावा, तसेंच तो ( छापील ) दोन अडीच पानांपेक्षां अधिक मोठा नसावा. श्रीसाईबाबांसंबंधीं आलेल्या अनुभवांचे स्वरूप सर्वसाधारण नसावें. वाचकांच्या मनावर परिणाम घडविणारे व त्यांना भक्ति-भावाचा व श्रद्धेचा धडा मिळेल असें त्यांचें स्वरूप असावें. अशा प्रकारच्या अनुभवास व लीलांस जरूर प्रसिद्धी दिली जाईल. तरी आमच्या समजूतदार लेखकांनीं व कवींनीं या वाङ्मयकार्यांत आम्हांला जितकें म्हणून सहकार्य देतां येईल व श्रीसाईलीलेचा दर्जा व उपयुक्तता वाढावी या दृष्टीने करतां येण्यासारखे असेल तें जरूर करावें. कृपा करून गैरसमज करून घेऊं नये. हे आपले सर्वांचेच सेवाकार्य आहे. प्रत्येकाने यथाशक्ति यांत भाग घ्यायचा. राग कोणी कोणावर करायचा? चुका घडतात; प्रेमाने व सहानुभूतिपूर्वक त्या नजरेस आणून देण्याचा आपणा सर्वांना हक्क आहे; परंतु तो बजावीत असतां आपण एकमेकांशीं सौजन्याने व बंधुभावाने वागूं या.

× × ×

श्रीसाईलीलेचा प्रसार महाराष्ट्रांत सर्वत्र व घरोघर होणें इष्ट आहे. पुढील महि-न्यापासून नवीन वर्ष सुरू होत आहे. हें मासिक भक्तजनांच्या दृष्टीने शक्य तेवढें सर्वांग-सुंदर व्हावे यासाठीं शक्तिनुसार आमचे प्रयत्न चालू आहेत हे वाचकांस दिसून येईलच. मागील अंकीं विनंती करण्यांत आल्याप्रमाणें श्रीसाईलीलेचे वर्गणीदार व वाचक जास्तींत जास्त वाढविण्याकडे आमच्या वाचकांनीं कृपा करून लक्ष पुरवावें व आमच्या-कडून अधिकाधिक उपयुक्त व भरीव स्वरूपाची सेवा करून घ्यावी एवढीच विनंती आहे.

—संपादक




संकलक : **आमचे प्रतिनिधि**

**श्री. एल्. वाय्. सटाणकर, शिरडी** :—मी श्रीसाईबाबांचा बऱ्याच वर्षांपासून भक्त आहे. मी शिरडीलाच संस्थानमध्यें नोकरी करून त्यांची सेवा करीत आहे. मी विवाहीत असून मला ५–६ मुलें आहेत. गेल्या ४–५ महिन्यापूर्वी माझी पत्नी हगवणीच्या विकारानें अत्यंत आजारी होती आणि विशेष म्हणजे त्यांत तिला दिवस लोटलेले होते. अशा परिस्थितीमुळें तिची प्रकृति अत्यंत खालावली होती व ५–६ लहान मुलें व हिची प्रकृति अशी...याच काळजीत मी असें. तिच्याकडून त्या स्थितींत काम धाम होत नसे व सारखी झोपून राहात असे. तेव्हां बाळंतपण कसें होणार याच चिंतेत मी असें. शेवटीं बाबांचें चरणीं प्रार्थना करून मी तिला माहेरी नवापूरला रवाना केलें. तें तालुक्याचें गांव असल्यानें वेळ प्रसंग पडल्यास डॉक्टर, नर्स मिळतील व येणारा धोका टळेल अशी आशा बाळगून मी सुमारें एक महिना काढला नसेल, तोंच मला नवापूरहून तार वजा पत्र आलें व मला तांतडीनें बोलाविलें. काय प्रकार असेल याची मला पूर्ण कल्पना नसल्यानें मी सारखा रस्त्यानें चिंता करीत नवापूरला जाऊन पोहोंचलों. घरांत पाऊल टाकलें तर माझी पत्नी अंथरूणांत पडलेली ! विचारलें असतां तिला बरोबर बोलतां येत नसल्याचें दिसून आलें. मी चौकशी करतां हा एक प्रकारचा अर्धांग वायूचा प्रकार असावा असें माझे सासरे श्री. कृष्णाजी म्हणाले. ते तर काय, फारच गांगरलेले दिसले. त्यामुळें मी आणखीच घाबरलों. पण सर्व भार श्रीसाईबाबांवर टाकून डॉक्टरकडे सदरबाबत चर्चा केली. तेव्हां त्यांनीं सुद्धां धोक्याची सूचना दिली. एवढेंच काय पण बाळंतपण एकों चांगल्या सुसज्ज अशा दवाखान्याखेरीज होणार नाहीं असें सांगितलें. मी मग मात्र सर्व संकट दूर करण्यासाठीं श्रीसाईमावलीस धांवत येणेंस सांगून औषध–पाण्याची व्यवस्था करून पत्नीस दररोज पाण्यांत बाबांची उदी टाकून पिण्यास सांगून शिरडीस नोकरीवर आलों. शिरडीस श्री. वि. ब. उर्फ अण्णासाहेब घाटे पुण्याहून आले व मला बाबांची उदी देऊन म्हणाले कीं, ही उदी परत नवापूरला पाठव व दररोज ती पाण्यांतून पिण्याबद्दल कळविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी केलें. लिहिण्यास आनंद होतो कीं माझी पत्नी दिनांक ५–९–१९५९ रोजी दुपारी घरींच सुखरूपणें कांहींएक त्रास न होता बाळंत झाली. हें

ऐकून मला फार आनंद झाला व माझ्या साईमाऊलीनें उदी–रूपानें जाऊन माझ्या पत्नीस बाळंतपणांतून सुखरूप उठविलें हें पाहून जीव संकटमुक्त झाला.

श्री. **शिवराम गणपत पवार,** काळबादेवी रोड–जांभुळवाडी, सुकटणकर बिल्डींग ३ रा माळा मुंबई नं. २ 'सन १९५२ सालीं माझी पत्नी टी. बी. नें बरेच दिवस आजारी होती. **एक्सरे** घेतला होता. मी रीझर्वबँकेत नोकरी असल्यानें बँकेच्या डॉक्टरचे औषध घेत होतों. १० महिने घेऊन कांहीं गुण आला नाहीं. एका भावीक स्नेह्यानें श्रीबाबांचे फोटोकडे बोट दाखवून एक नारळ त्यांचे नांवानें ठेऊन त्यांचे तीर्थ रोग्यास देण्यास व प्रार्थना करण्यास सांगितलें. तें सुरू केल्यापासून माझ्या पत्नीस आराम पडूं लागला व अन्न जाऊं लागलें. सुमारें सव्वा महिन्यानें बराच फरक पडला. नारळ ठेवल्यानंतर औषधपाणी बंद केलें होतें; परंतु बाबांच्या कृपेनें ताईची प्रकृती सुधारली इतकेंच नव्हे तर मला तिच्या पासून मुलगा झाला. त्यास दोन वर्षे झाली. अशा तऱ्हेनें माझें कुटुंब मला परत मिळालें. पत्नी बरी झाली तर बाबांचे दर्शनास सह-कुटुंब जाईन असा मी त्या वेळीं नवस केला होता; तो सन १९५४ सालीं फेडला. त्यापूर्वी मी कधीं प्रवास केला नव्हता; पण सोबत मिळून प्रवास निर्विघ्न झाला.

वरील प्रसंगापूर्वी श्री साईबाबांची मला बिलकूल माहिती नव्हती. एकदां, पत्नी आजारी असण्यापूर्वी, श्री साईबाबांचा फोटो मुंबईत नायगांव रोड वरील फ्रेम मेकरच्या दुकानांत पाहिला. बरेच फोटो फ्रेम करून ठेवले होते. त्यांत फक्त श्री बाबांच्या फोटो-कडेच माझें लक्ष वेधलें; कारण त्यांना दाढी होती आणि वाटलें कीं हे दाढीवाले देव कोण? ही शंका बरेच दिवस मनांत असतांच त्यांची प्रार्थना करण्याचा योग वरील प्रसंगानें आला, 'श्रद्धा व सबुरी' अनुभवास आली.

आवडीनें भावें हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पति तो लक्ष्मीचा जाणतसे ॥
सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाहीं ॥
जैशी स्थिति आहे तैशापरी राहे । कौतुक तूं पाहे संचिताचें ॥
एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश झाला ॥ ५१ ॥

## फ्रान्समधील एक आश्चर्यकारक

# देवस्थान

लेखक : रा. श्री. आगाशे

फ्रान्समधील या देवस्थानांत साईभक्तांना आपल्या परिचयाचीं अनेक वैशिष्ट्यें आढळून येतील. साईभक्तांचा सर्व संकटांतील आधार जी उदी; तिच्यांत ईश्वरी कृपेच्या अदृश्य अंशाखेरीज रोग, व्याधि व मनोव्यथा बरे करण्याचें किंवा कुठलेंही वैज्ञानिक वैशिष्ट्य नाहीं; तसेंच लोर्डस गांवांतील झऱ्याच्या पाण्यांत कोणतेही विशेष क्षार अथवा वैज्ञानिक गुण नाहींत. शिरडीच्या उदीचें महत्व जसें भक्तांच्या अनुभवांत आहे, तसेंच लोर्डसच्या पाण्याचें महत्त्व रोगनिवारणाच्या प्रत्यक्ष परिणामांत आहे.

फ्रान्सच्या नैऋत्य कोपऱ्यामध्ये, स्पेनच्या सरहद्दीवर एक छोटेसे पण सुंदर व टुमदार खेडें आहे. त्या खेड्याचें नांव आहे लोर्ड्स्; पिरॅनिज पर्वताच्या छोट्याशा दरींत बसलेले ते निसर्गरम्य लोर्ड्स् !—चर्चचीं उंच उंच शिखरें, त्यावरील क्रॉसचीं चिन्हे, हिरवीगार झाडी, उठावदार उद्याने, समृद्ध शेते, चमकणारे ओढे, स्वच्छ कोरडी हवा आणि यात्रेकरूंचा नादमधुर कोलाहल !

लोर्ड्सच्या पहाडांतील देवस्थानाच्या झऱ्यांत स्नान केल्याने असाध्य असे रोग बरे झाल्याचीं हजारों उदाहरणे आहेत. तेथील पाण्याचे शास्त्रीय विश्लेषण वैज्ञानिक व डॉक्टरांनीं केलें आहे; व रोग बरे करण्याचा कुठलाहि विशेष क्षार अथवा गुण त्यांना त्यांत आढळला नाहीं. लोर्ड्सच्या त्या झऱ्याचें पाणी अगदीं साधे, सामान्य, जसे दुसऱ्या कुठल्याहि झऱ्यांत आढळेल तसें आहे.

गेल्या शंभर वर्षांत येथें सर्व तऱ्हेचे शारीरिक व मानसिक रोग पूर्ण बरे झाल्याची नोंद आहे. या रोगनिवारणांचें वैशिष्ठ्य म्हणजे लोर्ड्स् येथील झऱ्यांत स्नान करण्या-

खेरीज किंबहुना केवळ डुबकी मारून बाहेर येण्याखेरीज कुठल्याहि तऱ्हेचा उपचार येथे उपलब्ध नाहीं. रोगनिवारण झालेंच, तर तें क्षणार्धांत, जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें, पूर्णतः व कायमचें होतें !

दरवर्षी सुमारे २० लाख यात्रेकरू लोर्ड्सला जातात. दहा हजारांत एक अशा अल्प प्रमाणांत रोगनिवारणाचा दृश्य प्रत्यय येतो. भाविक लोकांची श्रद्धा आहे कीं केवळ ईश्वरी कृपेमुळेच व दैवी चमत्कारानेंच हें रोगनिवारण होतें.

## देवस्थान कुणी व कसें स्थापन केलें ?

११ फेब्रुवारी १८५८ रोजीं बर्नाडेट नांवाची एक शेतकऱ्याची मुलगी जळणासाठीं जंगलांत काटक्या गोळा करीत होती. ज्या ठिकाणीं सध्यां सुप्रसिद्ध झरा आहे, त्याच्या जवळच बर्नाडेटला देवी मेरी हिने साक्षात् दर्शन दिलें. देवी मेरीने सांगितलें ‘ मी इथे आजपासून पंधरा दिवस रोज प्रकट होईन. गांवांतील धर्मगुरूंना सांग कीं इथें एक देऊळ ( चॅपेल ) स्थापन करा. यात्रेसाठीं लोकांची इथें रीघ लागावी अशी माझी इच्छा आहे. तूं प्रार्थना कर व इतरांनाहि प्रार्थना करावयास सांग.’

जवळच एका जागेकडे बोट दाखवून देवीनें सांगितलें ‘ जा, त्या झऱ्यांतील पाणी पी, व व हातपाय धू ’ बर्नाडेटनें पाहिलें तों तिथें झरा नव्हता. तिने थोडीशीं माती उकरल्या बरोबर तेथून पाण्याची धार वाहूं लागली आणि ती धार मोठी होत होत एक जोरदार झरा निर्माण झाला, तो आजहि अस्तित्वांत आहे.

बर्नाडेटने गांवकऱ्यांना सगळी हकिगत सांगितली. तिच्या श्रद्धायुक्त शब्दांवर त्यांचा विश्वास बसला. प्रार्थनेसाठीं ते तिच्या सांगण्याप्रमाणे जमूं लागले. एक छोटेसे ओबडधोबड देऊळ गांवकऱ्यांनीं बांधले, मेणबत्त्या लावल्या, फुलें वाहिलीं.

स्थानिक धर्मगुरू मात्र सुरवातीस या बाबतींत उदासीन व बेफिकिर होते. सरकारी अधिकारीहि बर्नाडेटच्या गोष्टीची थट्टा करीत. लोर्डसच्या त्या देवळाचें महत्त्व वाढूं लागलें तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांनीं बर्नाडेटच्या कुटुंबियांना तुरुंगांत डांबून ठेवण्याच्या धमक्या दिल्या.

## सरकारी रोष

स्वतः बर्नाडेटची साक्षात्कारावर पूर्ण श्रद्धा होती. अज्ञ व भोळ्या अशा त्या १४ वर्षें वयाच्या मुलीमध्ये साक्षात्कारानंतर विलक्षण तेज व सामर्थ्य उत्पन्न झालें. कारावासांत किंवा वेड्याच्या इस्पितळांत टाकण्याच्या धमक्यांना न घाबरतां तिने स्वतंत्र धीटपणें आपली श्रद्धा अढळ ठेवली. धमक्यांचा परिणाम होत नाहीं असें पाहून फ्रेंच सरकारने तें देवस्थान बंद करून त्याला कुलूप ठोकलें.

पण मग दैवी चमत्कार घडूं लागले ! चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं, याचा अनुभव इथेंहि आला. लोर्ड्सच्या त्या झऱ्यांत स्नान केल्यानें मरणासन्न रोगी बरे होऊं

लागले, आंधळ्यांना दृष्टी आली. निरनिराळ्या ठिकाणाहून रोगनिवारणांसाठीं लोक त्या ठिकाणीं येऊं लागले.

तिसऱ्या नेपोलियनच्या मुलाचाहि रोग लोर्ईस्च्या पाण्याने बरा झाला म्हणतात. व फ्रेंच सरकारने बंदी उठवून तें देऊळ व देवस्थान सर्वांना खुलें केलें.

स्थानिक बिशपनें नेमलेल्या निःपक्षपाती समितीने कसून चौकशी करून १८६२ सालीं असें जाहीर केले कीं, बर्नाडेट्च्या साक्षात्काराची कथा सत्य व विश्वसनीय आहे. १८७९ मध्ये बर्नाडेट मरण पावली. परतु तिला संतमालिकेंत स्थान मात्र त्यानंतर ५४ वर्षांनीं १९३३ सालीं पोपच्या समक्ष मोठ्या समारंभाने देण्यांत आलें !

## सामाजिक रोष व मान्यता

सामाजिक क्षेत्रांतहि लोर्ईस्चें माहात्म्य मान्य होण्यास अनेक वर्षें लागलीं. लोर्ईस्च्या चमत्कारावर विश्वास ठेवणाऱ्यांना वेडगळ व अंधश्रद्धाळू समजण्यांत येई. लोर्ईस्चे यात्रेकरू म्हणजे मनोविकृति झालेल्या भोळया व मूर्ख लोकांचा मेळावा असें समजत असत.

१८८५ सालीं लोर्ईस् येथील रोगनिवारणाच्या उदाहरणांची कसून तपासणी करण्यासाठीं एक डॉक्टरी समिती नेमण्यांत आल्यावर अनेक डॉक्टर कुतूहलानें लोर्ईस्-कडे आकर्षित झाले. लोर्ईस्कडे पाहण्याचा एक गंभीर व प्रामाणिक दृष्टिकोन पसरूं लागला. तरीहि १९०५ मध्ये अलेक्सिस कॅरेल नांवाच्या तरुण डॉक्टरला लिऑन्स मेडिकल फॅकल्टीमधून अशासाठीं बरखास्त करण्यांत आलें कीं, त्यानें आपला एक क्षय रोगी पेशंट लोर्ईस् येथें दैवी चमत्कारामुळें बरा झाला असें जाहीर केलें ! पुढें १९१२ मध्ये याच डॉक्टरला त्याच्या संबोधनाबद्दल जगप्रसिद्ध नोबेल प्राईज देण्यांत आलें. याच वर्षी जीन बॅान या डॉक्टर विद्यार्थिनीचा लॉर्ईस्च्या रोगनिवारणाबद्दलचा प्रबंध फेटाळ-ण्यांत आला. १९३० सालीं त्याच विषयावरील प्रबंधाबद्दल पॅरिस विश्वविद्यालयानें हेन्री मॉनीरला डॉक्टरेट पदवी दिली !

## डॉक्टरांची मान्यता

बॉनेफॉन नांवाच्या वृत्तपत्र संपादकाने पॅरिस येथे १९०६ सालीं असा प्रचार चालविला कीं लोर्ईसचे देवस्थान आरोग्य विघातक व गलिच्छ असल्यामुळे ते बंद करण्यांत यावें. त्याला जबरदस्त उत्तर लिऑन्स येथील डॉ. विन्सेंटने दिलें; ३००० डॉक्टरांच्या सह्यानिशीं त्याने एक प्रमाणपत्र प्रसिद्ध केलें कीं ' ज्या रोग्यांना बरे करण्यास आम्ही डॉक्टर लोक असमर्थ होतों त्या रोग्यांना बरे करण्याचें लोर्ईस येथे अत्यंत महत्त्वाचे दैवी कार्य घडलेले आहे; त्या कार्यांत कुठल्याहि तऱ्हेचा अडथळा आणूं नये.'

नामांकित डॉक्टरांनीं लोर्ईस येथील रोगनिवारणाच्या दैवी चमत्कारांच्या सप्रमाण सत्यकथा ग्रंथरूपांत प्रसिद्ध केल्या आहेत. आधुनिक शास्त्रांत पारंगत डॉक्टर लोक जेव्हां

लोर्ड्सला मान्यता देऊं लागले, तेव्हां लोकांचा विरोध व उपेक्षा हळूहळूं कमी होऊन एका आदरयुक्त दृष्टिकोनांतून लोर्ड्स् येथील देवस्थानाकडे लोक पाहूं लागले.

विविध धर्म पंथांचे निरनिराळ्या राष्ट्रांतील यात्रेकरू लोर्डसकडे दरवर्षी धांव घेतात, त्यामुळे हें मंदिर अखिल जागतिक तीर्थस्थान बनलें आहे.

## आंतरराष्ट्रीय डॉक्टरी संघटना

लोर्डस येथील रोगनिवारणाचा शास्त्रशुद्ध अभ्यास व तपासणी करण्यासाठीं ५००० डॉक्टरांनीं एक आंतरराष्ट्रीय डॉक्टरी संघटना स्थापन केली असून त्यांत आस्ट्रेलिया, आर्जेंटिना, भारत, इजित, तुर्कस्थान, स्पेन, स्वीडन, इंग्लंड, युनायटेड स्टेटस इत्यादि अनेक देशांतील डॉक्टर आहेत. वीस नामांकित डॉक्टरांची समिति रोगनिवारणाच्या केसेस तपासून खरोखरीच दैवी चमत्कारानें रोग बरा झाला कीं नाहीं याची परीक्षा करते. त्यांची खात्री पटली तरच ती केस दैवी चमत्कारांत गणली जाते व त्याप्रमाणें जाहीर केलें जातें.

रोगनिवारण हें लोर्डसच्या महात्म्यांतील केवळ एक अंग आहे. शास्त्रीय चिकित्सा करण्याच्या पाश्चात्यांच्या संवयीमुळें रोगनिवारणाला एवढें महत्त्व आलें आहे. रोग बरें होण्या संबंधी दैवी चमत्कारांचा प्रत्यक्ष पुरावा चिकित्सकांना मिळतो. **परंतु लोर्ड्सचे खरें इंगित तेथील भक्तिमय ईश्वरचिंतनांत आहे.** संसारतापांतून शीतलता उत्पन्न करणारें वातावरण, मनाला मिळणारी शांति हिचें अधिक महत्त्व आहे. हा मानसिक आनंद व शांति केवळ अनुभवाचीच गोष्ट आहे. त्याला मोजमाप, पुरावा–प्रमाण याचें आवडंबर कशाला? **लोर्ड्स् येथें मनामध्यें जें परिवर्तन घडतें त्यामुळेंच लाखों यात्रेकरू समाधानानें परततात. कितीपैकीं किती रोगी बरे झाले याकडे त्यांचें लक्ष नसतें.**

## शिरडी आणि लोर्ड्स् यांतील साम्य

लोर्ड्सच्या हकीगतीमध्यें साईभक्तांना आपल्या परिचयाचीं अनेक वैशिष्ट्यें आढळतील. साईभक्तांचा सर्व संकटांतील आधार जी उदी, तिच्यांत ईश्वरी कृपेच्या अदृश्य अंशाखेरीज रोग–व्याधि–मनोव्यथा बरे करण्याचें किंवा कुठलेंहि वैज्ञानिक वैशिष्ट्य नाहीं. तसेंच लोर्ड्स् येथील झऱ्याच्या पाण्यांत कोणतेहि विशेष क्षार अथवा वैज्ञानिक गुण नाहींत. **शिरडीच्या उदीचें महत्त्व जसें भक्तांच्या अनुभवांत आहे,** तसेंच लोर्ड्सच्या पाण्याचें महत्त्व रोगनिवारणाच्या प्रत्यक्ष परिणामांत आहे.

श्रीसाईबाबांच्या समाधीच्या दर्शनानें किंवा उदीमुळें अमुक व्यक्तीचे कष्ट किंवा विशिष्ट व्याधिव्यथा बरी झाली म्हणून प्रत्येकाला तो अनुभव आलाच पाहिजे असें म्हणणें चुकीचे होय, हें प्रत्येक विचारवंत साईभक्त जाणतो. त्याचप्रमाणें लोर्ड्सला जाणारे लाखो यात्रेकरूहि समजून असतात कीं दहा हजारांत एकाद्यावर ईश्वरी कृपा होऊन त्याच्या व्याधिव्यथा नष्ट होतात. **निःसीम श्रद्धा व सबुरी हेंच खरें भांडवल.**

प्रसिद्ध साईभक्त कै. काकासाहेब दीक्षित यांचा पाय अपघातांत लंगडा झाला. तो बरा व्हावा या तात्कालिक इच्छेनें त्यांचें मन साईबाबांकडे वळलें. परंतु प्रत्यक्ष दर्शनानंतर ते आपलें लंगडेपण विसरून गेले. त्यांना वेगळाच मानसिक आनंद व शांति श्रीसाईंच्या सान्निध्यांत अनुभवास आली. **'माझा पाय लंगडाच राहूं दे माझ्या लंगड्या मनाला मात्र ठीक करा.'** असें त्यांना वाटूं लागलें. लोर्ड्‌स्‌च्या यात्रेकरूंत प्रत्येकाला अनुभव येतो कीं 'आपल्यापेक्षां तो पलीकडचा किती दुःखी आहे! त्याला मदत करूं या, त्याच्यासाठींच प्रार्थना करूं या. १० हजारांत एकावर ईश्वरी कृपा असेल तर ती त्याच्यावरच होऊं दे. त्याच्यापेक्षां मी पुष्कळच सुखी आहे! मला कांहींच दुःख नाहीं!' **बस्स! मनांतच आनंदाचा, सुखाचा जन्म झाल्यावर शारीरिक–व्याधि उपाधींना कोण विचारतो?**

## श्रद्धेला व सबुरीला साद मिळतोच

प्रत्येकाची व्याधि उपाधि व त्यावरचा उपाय वेगवगळा असतो. अढळ श्रद्धेला व सबुरीच्या ईश्वराकडून हमखास साद मिळत असतो. हा अनुभव लोर्ड्‌स्‌ काय किंवा शिरडी काय सर्वच देवस्थानांत येऊं शकतो.

हरवलेल्या घोडीला शोधणाऱ्या चांदभाईबरोबर चिलीम पितांना अग्नि व छापी भिजविण्याकरितां पाणी हवें होतें. त्यावेळीं चिमटा आपटून अग्नि व झरा उत्पन्न करणाऱ्या साईबाबांची आठवण बर्नाडेटनें माती उकरतांच झरा उत्पन्न झाला ही गोष्ट वाचतांना येते. शिरडीला मुंग्याप्रमाणें भक्तांची रीघ लागेल असें श्रीसाईबाबांनीं सांगितलें व तें खरें ठरलें. 'यात्रेकरूंची इथें रीघ लागावी अशी माझी इच्छा आहे' असें देवी मेरीनें लोर्ड्‌स्‌ येथें सांगितलें व आज दरवर्षी २० लाख यात्रेकरू लोर्ड्‌स्‌ला जातात.

मला बुटींच्या वाड्यांत ठेवा असें श्रीसाईबाबांनीं समाधीपूर्वी सांगितलें. इथें देऊळ ( चॅपेल ) बांधा असें देवी मेरीनें लोर्डस्‌ येथें सांगितलें. साईबाबांना सुरवातीला वेडा फकीर असें समजत. औषधें, विपरीत खाद्यपदार्थ व उदी या उपचारांनीं पीडितांच्या व्याधिउपाधि बऱ्या करून साईबाबांनीं भक्तांना आकर्षित केलें. लोर्डस्‌च्या पाण्यानें झालेल्या रोगनिवारणामुळें लोर्डस्‌कडे भक्त धांवले. पणत्यांत पाणी जाळून लोकांना चकित करून साईबाबांनीं ईश्वरी शक्तीची चुणूक दाखविली, तेव्हां लोक त्यांना शरण गेले. लोर्डसवरील बंदी आणि लोकांचा विरोध अशाच चमत्कारांनीं कमी झाला.

निराकार ईश्वरास मानणाऱ्या युरोपियन लोकांना निराकार स्वरूपांतच पाण्याच्या दैवी चमत्कारानें आपल्याकडे ओढून ईश्वरचिंतनाकडे देवी मेरीनें वळविलें. सगुण, साकार प्रमाण हवें असलेल्या भारतीयांना साईबाबांनीं शिरडी येथें प्रत्यक्ष वास करून त्याच ईश्वरी शक्तीचा प्रत्यय दिला व ईश्वरचिंतनाकडे असंख्य लोकांना ओढलें.

**ती ईश्वरी शक्ति आज लोर्ड्‌स्‌ येथेंहि व शिरडी येथेंहि धर्मनिरक्षेप स्वरूपांत कार्य करीत आहे.** परमार्थप्रवण भक्तांस तर ती शक्ति स्वतःच्या अंतःकरणांतच प्रकट झाल्याचा अनुभव येतो, तिच्या सतत सान्निध्याचा अनुभव येतो. *

* रूथ कॅन्स्टनच्या 'मिस्टरी ऑफ लोर्डस' या ग्रंथाच्या आधारें.

श्री. दासगणूकृत अर्वाचीन श्रीभक्त लीलामृत—

# दत्तावतार श्रीमाणिक प्रभू ( १ )

लेखक : **आप्पाराव**

ह. भ. प. श्रीदास गणू महाराज यांचें ओवीबद्ध अर्वाचीन श्रीभक्तलीलामृत आमच्या वाचकांच्या परिचयाचें असेल. त्याची माधुरी अवीट आहे. त्या लीलामृतांतील कांहीं अध्यायांचा गद्यानुवाद क्रमशः देण्याचा उपक्रम सुरू करण्यांत येत आहे.



हैद्राबाद संस्थानांत गुलबर्ग्यानजीक कल्याण नांवाचें एक गांव आहे. तेथें मनोहरपंत या नांवाचे एक सुखवस्तू गृहस्थ रहात असत. ते निजामाच्या पदरीं सरदार होते. मग त्यांच्या वैभवांत कसली कमतरता असणार ? त्यांची पत्नी बयाबाई म्हणजे जणूं अनुसूया, अन्नपूर्णा किंवा जानकीच. यापेक्षां तिचें अधिक वर्णन तें काय करायचें ! अत्यंत सदाचारसंपन्न व गुणवान् असें तें कुटुंब होतें. श्री दत्तप्रभूवर त्यांची आत्यंतिक भक्ति. त्यांना उणीव कशाचीही भासत नव्हती; पण ईश्वर सर्व परीनें सुसंपन्न करून कोणाला ठेवीत नाहीं. कांहीं ना कांहीं तरी उणीव भासवितोच. त्यांना मूलबाळ नव्हतें. त्यासाठीं जीव तीळ तीळ तुटत होता त्यांचा ! देवा ! आम्हांला निपुत्रिक ठेऊं नको म्हणून पतिपत्नी रोज देवाची अनन्यभावें करुणा भाकीत होतीं. संसारांतील ती उणीव त्यांना तीव्रतेनें जाणवत असे.

## देव प्रार्थनेला पावला

श्री दत्तमहाराजांवर त्यांची निष्ठा अनन्यसाधारण होती. शेवटीं देव त्यांच्या प्रार्थनेला पावला. त्यांना पुत्रलाभ झाला. त्याचें नाव ठेवलें हनुमंत. पुत्रलाभामुळें किती आनंद झाला आहे उभयतांना ! तो लहानाचा मोठा होऊं लागला. त्याला तीन वर्षें

झालीं तरी त्याला बोलतां येईना. त्याचे सारे व्यवहार खुणेनें चालावयाचे. बोलायला येत नाहीं तो मुका! आणि साऱ्यांना तो मुकाच वाटूं लागला. आई वाडिलानीं पुष्कळ प्रयत्न करून पाहिले; परंतु त्यांना यश आलें नाहीं. निराश झालीं बिचारी! जनरूढीप्रमाणें त्या मुलाचें मौजिबंधन करण्यांत आलें व त्याच्या कानांत गायत्रीमंत्र सांगण्यांत आला. तो मंत्र कानीं पडतांच हनुमंत एकाएकीं बोलूं लागला. तो बोलूं लागला तो काय आणि कसा? सारे वेद तो भडाभड बोलूं लागला. सर्वांना आश्चर्य वाटलें त्याचें! हा कोणीतरी योगभ्रष्ट जन्माला आला आहे असें सर्व लोक म्हणूं लागले. तो कोणत्याहि बाबतींत कोणाशीं बोलत नसे. संसारांत त्याचें मन मुळींच नव्हतें. त्याला नेहमीं एकांतवास आवडत असे. तो आत्मविद्येमार्गें लागलेला होता. हा कोणीतरी अवतारी महात्मा आहे. जगाच्या उद्धारासाठीं त्यानें जन्म घेतला आहे असें लोक म्हणत असत. मुलाचें संसारांत मुळींच लक्ष नाहीं हें पाहून आईवडिलांस मनस्वी दुःख होऊं लागलें. श्रीदत्त महाराज इच्छा पुरविणारे; तेच समर्थ आहेत. आपली संसारी मुलासंबंधींची इच्छा पूर्ण करावी म्हणून त्यांनीं श्रीदत्त महाराजांची अहोरात्र करुणा भाकली.

एके दिवशीं श्रीदत्तमहाराज मनोहरपंतांच्या स्वप्नांत प्रगट झाले व म्हणाले 'मी प्रसन्न झालों आहें; काय इच्छा आहे ती सांगून टाका. तुमची इच्छा पूर्ण करण्यासाठीं आलों आहे. मनांत संकोच बाळगूं नका.'

मनोहरपंत हात जोडून म्हणाले 'भगवंता, आमच्या प्रार्थनेस मान देऊन तूं आम्हांला पुत्र दिलास, परंतु तो सन्यस्त वृत्तीचा निघाला. एकांतांत बसून अध्यात्म चिंतन करण्याशिवाय त्याला दुसरें कांहीं सुचत नाहीं. त्याला संसाराची मुळींच ओढ नाहीं. मला माझ्या वंशाला आधार पाहिजे. आमच्या मागें आमचा गृहसंसार चालू राहिला पाहिजे. आम्हांला व आमच्या वाडवडिलांस सद्गति मिळाली पाहिजे.

## श्रीदत्तमहाराजांचा आदेश

यावर श्रीदत्त महाराज म्हणाले, 'माझ्यासारखा पुत्र व्हावा अशी तुझी इच्छा आहे ना? मग त्याप्रमाणें मी तुझ्या घरीं जन्म घेतों हें निश्चित समज; परंतु मीही संसारांत रहाणार नाहीं. माझ्या इच्छेनुरूप मी सर्वत्र हिंडून फिरून पतितांचा उद्धार करीन. तुम्हीं त्याच्या आड येऊं नये. त्यानंतर तिसरा पुत्र जन्मास येईल. तो संसार करील. व गृहस्थाश्रम स्वीकारून तुमच्या साऱ्या इच्छा पूर्ण करील.'

मनोहरपंत जागे होऊन चोहोंकडे पाहूं लागले. त्यानीं बयाबाईस स्वप्नाचा सर्व वृत्तांत निवेदन केला. तिलाही ऐकून आनंद झाला. ही घटना गुप्त रहाण्यासारखी नव्हती. ही वार्ता साऱ्या गांवभर सोसाट्याच्या वाऱ्यासारखी हां हां म्हणतां पसरली. कल्याणांत श्रीदत्तावतार होणार म्हणून कल्याणचें महत्व व अभिमान, त्याचप्रमाणें मनोहरपंतांच्या वाट्यास हें महद्भाग्य येणार म्हणून त्यांच्या घराण्याचेंही महत्व.

मनोहरपंत खरोखर भाग्यवंत. प्रत्यक्ष परमेश्वर जन्माला यायचे, यापेक्षां कोणतें असणार महत् भाग्य ! नऊ महिने पूर्ण होऊन दहावा महिना सुरू झाला व एका शुभ मुहूर्तावर 'दत्तात्रय उदरीं आले ! मातेचें मन हरिखलें ! कल्याणनगर आनंदलें ! आनंदोत्सव घरोघरी ! !'

या दिव्य बाळाचें वर्णन आम्हीं काय करणार ? त्याचें मोठ्या थाटांत बारसें होऊन 'माणिकप्रभू' हें त्याचें गोड नाव ठेवण्यांत आलें. माता बयाबाई खरोखर धन्य होय. कलियुगांत अशा प्रकारचें भाग्य वाट्याला येणें ही साधी गोष्ट नव्हती. कल्याण नगरींत श्रीदत्त महाराज जन्माला आले आहेत ही आनंदवार्ता ज्यांनीं ज्यानीं ऐकिली ते आपापलें कल्याण साधण्यासाठीं त्या नगरीकडे धांव घेऊं लागले व बाळाच्या दर्शनाने पुण्यपावन होऊं लागले.

पुढें योग्य समयीं प्रभूचा व्रतबंध झाला. वेदउपनिषदें व स्मृतिपुराणें म्हणजे त्यांच्या हातचा मळ होऊन राहिला होता. देवाला कां कोणी शिकवावें लागतें ? परंतु बालपण हें समवयस्क संवगड्यांबरोबर खेळून शोभवावयाचें असतें. लहान मूर्ति पण कीर्ति थोर होती या बाळाची ! त्या बाल वयांतहि श्रीकृष्णाप्रमाणें प्रभूनीं नाना प्रकारचे चमत्कार करून सर्वांना आश्चर्याचे धक्के दिले ! अशा असंख्य चमत्कारांपैकीं एक चमत्कार येथें सांगावासा वाटतो.

## भिमाबाईची अनन्य श्रद्धा

आप्पासाहेब राजे ही हैद्राबाद नगरींतील एक थोर व सुसंपन्न व्यक्ति; त्यांचीहि तीच रड ! मूलबाळ नाहीं, म्हणून पतीपत्नी नेहमीं दुःखीकष्टी. पत्नीचें नाव होतें भीमाबाई. मोठी श्रद्धावान्. तिच्या कानीं बाल माणिक प्रभूची ख्याति गेली व त्यांचें दर्शन घेण्याची तिला अनावर इच्छा झाली. बरोबर जरूर तेवढा लवाजमा घेऊन ती कल्याणला जाण्यासाठीं बाहेर पडली. त्या काळचें प्रवासाचें साधन म्हणजे मेणा. पुढेंमागें घोडेस्वार, मध्यें मेणा, आजूबाजूस दासदासी अशा थाटांत ती कल्याणांत आली. त्यावेळीं प्रभू आपल्या बालसवंगड्यांसह खेळत होते. खेळतां खेळतां डाव प्रभूच्या अंगाशीं आला. ही लीला प्रभूचीच. त्या मुलांनीं माणिक प्रभूला खालीं पाडलें व त्याच्या छातीवर बसून मारझोड करूं लागले. म्हणत होते, 'आमच्या कवड्या अगोदर देऊन टाकतोस की नाहीं ? सोडणार नाहीं तुला ! बोल ! आणखी मार खायचा आहे का ?'

त्याचवेळीं त्या वाटेनें भिमाबाईचा मेणा चालला होता. ते कर्णकठोर शब्द तिच्या अचानक कानीं पडले व मारामारीचें दृश्यही दृष्टीस पडलें. अंतःकरण द्रवलें. आपल्या नोकरास हांक मारून त्या मुलास सोडविण्याची तिनें आज्ञा केली.

आज्ञा होतांच ५ । ६ नोकर त्या मुलाच्या अंगावर धांवत गेले व त्यांना दटावीत ओरडले कीं, त्या पोरास एकटा पाहून काय हा अत्याचार चालविला आहे रे तुम्हीं ! सोडतां कीं नाहीं त्याला ? मार पाहिजे वाटतें ?

बिचारीं मुलें घाबरून सैरावैरा पळत सुटलीं. प्रभू त्या नोकरांस उद्देशून म्हणाले, 'तुम्हांला आम्हां मुलांच्या भांडणांत पडण्याची काय जरूरी ? आम्हीं आमचें पाहून घेऊं ! तुम्हीं जा आपल्या कामाला ! त्यांनीं मला मारलें म्हणून काय झालें ? तुम्हीं कशाला त्यांना दटावतां ? मी त्यांच्या आठ कवड्या देणें लागतों. म्हणून ते माझे सोबती मला मारझोड करताहेत. यांत त्यांचा काय बरें दोष ? त्यांना आठ कवड्या देऊन माझी जो सुटका करील त्याला श्रीदत्तकृपेनें आठ पुत्र होतील !'

ती शुभसूचक वाणी ऐकून भिमाबाईला पराकाष्ठेचा आनंद झाला. तिनें त्या मुलांस बोलावून आठ कवड्या देऊन टाकल्या व प्रभूची देण्यांतून सुटका केली.

नंतर भिमाबाईस उद्देशून प्रभू म्हणाले, 'बाई ! तुम्हीं कांहीं चिंता करूं नका. तुम्हांला एकेक कवडीमागें एकेक पुत्र होईल हें निश्चित समजा !' याप्रमाणें आश्वासन दऊन प्रभू तेथून पळाले व बाई गांवात आपल्या मुक्कामीं गेल्या.

नंतर भिमाबाईची व मनोहर पंतांची भेट झाली. त्यानीं योग्यतेनुसार बाईंचा सत्कार केला; परंतु त्यांना त्यांत गोडी वाटत नव्हती. त्या हात जोडून मनाहरपंतांस म्हणाल्या, 'तुमचे चिरंजीव कुठें दिसत नाहींत. ते दत्तावतार आहेत. मी त्यांच्या दर्शनासाठीं मुद्दाम आल्यें आहे. त्यांची माझी भेट घडवून आणा. त्याशिवाय मी आज पाण्यास शिवणार नाहीं !'

याप्रमाणे त्यांचें बोलणें चाललें आहे तोंच प्रभू त्याठिकाणीं अचानक आले. सर्वांना व विशेषतः भिमाबाईंना त्यांना पाहून अत्यानंद झाला. त्या कौतुकमिश्रित आदरानें त्यांच्याकडे पहात राहिल्या. गांवाबाहेर कवड्या देऊन ज्यांची सुटका केली तीच ही मूर्ति, हें त्यांनीं ओळखलें.

आधिक न बोलतां प्रभूनीं पुन्हां तोच आशीर्वाद देऊन व निश्चित मनाने आपल्या गांवी जा, असें आश्वासन देऊन तेथून पलायन केलें ! पुन्हां कांहीं त्यांचें दर्शन घडले नाहीं.

कल्याण येथे बराच दानधर्म करून व सर्वांचे शुभाशीर्वाद घेऊन भिमाबाई हैद्राबादला गेल्या. त्यानीं घडलेली सर्व हकिगत आपल्या पतिराजास मोठ्या भक्तिभावाने सांगितली.

## आप्पाराजे हसूं लागले

सर्वांचीं मनें कांहीं सारखी नसतात. आप्पाराजे तो वृत्तांत ऐकून खदखदां हसूं लागले. म्हणाले 'तें ल्हानगें कल्याणचें पोर ! आणि तो म्हणे दत्तावतार ! असं कधीं घडलं आहे ? तुझा भाव त्याच्यावर कसा जडला हेंच समजत नाहीं. अशा गोष्टीवर मी बिलकूल विश्वास ठेवणार नाहीं. तें शेंबडे पोर काय तोंडाला येईल तें बोललें आणि तुझा त्याच्यावर विश्वास बसला ! सारा वेडेपणाचा बाजार आणि दुसरें काय ? कल्याणच्या वेडसर लोकांनीं उगाच त्याचें कांहींतरी बंड माजवून ठेवलं आहे ! म्हणे कवडी गणिक मुलं होणार ! बायकांस अक्कल नसते म्हणूनच असला भोंदूपणा चालू शकतो ! आम्हीं नाहीं ठेवणार अशा गोष्टींवर विश्वास !'

असं म्हणतां म्हणतां एक वर्ष संपत आलें. भिमाबाईच्या गर्भारपणाचीं चिन्हें दिसूं लागलीं. सर्वांना व विशेषतः आप्पाराजे याना आश्चर्य वाटूं लागलें. आणि हातच्या कांकणाला आतां आरशाची जरूरी राहिली नव्हती. भिमाबाई म्हणाल्या, 'आतां तरी सत्पुरुषाची निंदा करूं नका. सरळ जाऊन माणिक प्रभूंच्या पायांवर मस्तक ठेवा आणि त्यांची क्षमा मागा !'

क्षमा मागा न मागा; काळ कोणासाठीं थांबत नाहीं. त्याचें कार्य अव्याहत चालू असतें. महिने भरतांच भिमाबाई बाळंत झाल्या. पुत्ररत्न जन्मास आल्याचें पाहून सर्वत्र आनंदी आनंद बहरला. एवढ्यानें काय झालें? दुसऱ्या वर्षी दुसरा पुत्र झाला.

प्रभूंच्या भेटीसाठीं भिमाबाई अत्यंत उत्कंठीत झालेली होती. केव्हां कल्याणला जाईन व आपले हेतू पूर्ण करणाऱ्या प्रभूंच्या पायांवर मुलांना कधीं घालीन असें तिला झालें होतें. एकेदिवशीं नोकर चाकरांसह भिमाबाई दर्शनार्थ निघाली. प्रभूंची सेवा आपल्याकडून घडावी व प्रभूंना डोळे भरून पहावें हीच आस तिला लागून राहिली होती. कल्याण येथें येतांच ज्या ज्या प्रकारें प्रभूंची सेवा करतां येईल त्या त्या प्रकारें करून तिनें दानधर्म मोठ्या प्रमाणांत केला.

कृपावंत देव प्रसन्न झाल्यावर काय कमी पडणार आहे? भिमाबाईला लागोपाठ पांच मुलें झालीं! 'देतां किती घेशील दो करांनीं!' प्रभु देत होते; परंतु भिमाबाईची आतां पूर्ण तृप्ति झालेली होती. 'देवा! आतां हें सत्र एवढ्यावरच थांबूं दे! मात्र दिलेल्या रत्नांना सुखी ठेव!' अशी प्रभूपाशीं करुणा भाकण्याची तिच्यावर पाळी आली. प्रभूंनीं तीही इच्छा पूर्ण करून नेहमीं श्री दत्तमहाराजांची आठवण ठेव, तुझे हेतु पूर्ण होतील, असा तिला शुभाशीर्वाद दिला.

(पुढें चालू)

ARSA PRODUCTS

ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स

# कांहीं प्रासंगिक विचार

लेखांक २ रा

ले. नि. पां. सातपुते, मुंबई.

नमो ज्ञानेश्वरा निष्कलंका। जयाची गीतेची वांचितां टीका
ज्ञान होय लोकां। अति भाविका ग्रंथार्थियां

—श्रीएकनाथ महाराज.

पूर्वी म्हटलेंच आहे कीं, ज्ञानेश्वरी ही आबाल, सुबोध अशा ओवी छंदांत 'बाळ्या भोळ्या' जनांसाठीं ज्ञानेश्वर महाराजांनीं केलेली मराठी टीका आहे. ज्ञानेश्वरीचें मूळ नामाभिधान 'भावार्थ–दीपिका' असें आहे; परंतु ज्ञानेश्वर महाराज विरचित अशा अर्थानें या ग्रंथाचें 'ज्ञानेश्वरी' हेंच नांव रूढ झालें आहे. ही टीका भगवद्गीता या जगन्मान्य तत्त्वज्ञानविषयक संस्कृत ग्रंथावर आहे. ही समजण्यास ज्ञानेश्वरांच्या श्रोत्यांस अडचण पडल्याचा उल्लेख ज्ञानेश्वरींत आढळून येत नाहीं. उलट, वेदांतासारखा रुक्ष समजला जाणारा विषय इतक्या सोप्या व सुलभ रीतीने मांडल्याबद्दल श्रोत्यांनीं ज्ञानेश्वरांना धन्यवाद दिल्याचे अनेक प्रसंग ज्ञानेश्वरींत दिसून येतात.

मूळ भगवत्गीतेचे अठरा अध्याय मिळून सातशें श्लोक आहेत व त्यांवरील ज्ञानेश्वरीरूप टीका ओव्यांची संख्या भिन्नभिन्न उपलब्ध हस्तलिखितांपरत्वें न्यूनाधिक्यानें नऊ हजारांच्या आसपास आहे. यांत गीतेच्या एका श्लोकावरील टीकाविस्तार कमींत कमीं एक ओवीपासून ( गी. २–२२. ज्ञा. २–१४४ ) जास्तींत जास्त ३२८ ओव्यांपर्यंत ( गी. १३–७ ज्ञा. १८५–५१२ ) आहे. या विवेचनाचा उद्देश असें म्हणण्याचा आहे कीं, खुद्द ज्ञानेश्वरी हेंच मुळांत गीतेवरील आवश्यक तितकें विस्तृत प्रवचन आहे. या संदर्भांत ज्ञानेश्वरींतील 'म्हणोनि इया वाहणी। केली म्यां उपलवणी। वांचूनि दुधा मेळवूनि पाणी। फार कीजे काई॥ ( ज्ञा. १३–८५३ ). या मतास पोषक असा एक श्लोक परंपरागत गीतामहात्म्यांत खालीलप्रमाणें आहे—

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपाल नंदनः।
पार्थो वत्सःसुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत॥

याचा भावार्थ असा कीं भगवान श्रीकृष्णरूपी गो–पालाने सर्व उपानिषदें याच कोणी गायी, यांचें दोहन करून ( धार काढून ) गीतारूपी दूध सिद्ध केलें व त्याच्या सेवनाचा लाभ बुद्धिमान जो अर्जुन त्याला झाला. यालाच पुष्टिरूप ज्ञानेश्वरींतील पुढील ओवी आहे. ' तैसे गीतेचें हें दुभते । वत्स करूनि पार्थातें । दुभीनली जगापुरते । श्रीकृष्ण गाय ॥ ( ज्ञा. १८–१६८९ ) पर्यायाने सातशे श्लोकात्मक गीतारूप संस्कृत दुधाप्रमाणेंच, नऊ हजार ओव्या असलेलें ज्ञानेश्वरी हें मराठी गीतादुग्ध आहे.

शुद्ध दूध सर्वांनाच मानवतें किंवा पचवितां येतें असें नाहीं. बालकें व अशक्त माणसें यांच्या बाबतींत दुधामध्यें इष्ट हेतूच्या सिद्धीसाठीं योग्य प्रमाणांत पाणी मिळविण्याची आवश्यकता असते. मूळ गीताशास्त्र अर्जुनास भगवान श्रीकृष्णांनीं भारतीय युद्धाच्या रणभूमीवर ऐन मोक्याच्या वेळीं त्यास झालेल्या मोहाच्या निवृत्तीसाठीं सांगितलें. ज्ञानेश्वर महाराज लिहितातः आणि कृष्णा जुनीं जे मोकळी । गोठी चाळविली निराळी । ते श्रीव्यासें केली करतळीं । घेवो ये ऐसी ॥ ( ज्ञा. १८–१६९६ ) या ओवीवरून असें अनुमान काढतां येतें कीं, श्रीकृष्णांनीं अर्जुनास सांगितलेलें मूळ गीताशास्त्र ही 'निराळीं चावळलेली गोठी' होती. त्या उपदेशाचा भावार्थ संस्कृतांत श्रीव्यासांनीं सातशे श्लोकांच्या विस्ताराने विषयपरत्वें अठरा अध्यायांत विभागून जगतास उपलब्ध करून दिला, ( त्याबद्दल ज्ञानेश्वर महाराजांनीही ज्ञानेश्वरीच्या उपसंहारांत कृतज्ञतेचे उद्गार नमूद केले आहेत ), व तोच ज्ञानेश्वर महाराजांनीं त्यापेक्षांही जास्त विस्ताराने नऊ हजार ओव्यांच्या रूपांत मराठी भाषिकांसमोर ठेविला आहे. तेव्हां या गीता दुग्धांत तत्कालीन समाजाची धारणा लक्षांत घेऊन श्रीव्यास व ज्ञानेश्वर महाराज यांनीं योग्य प्रमाणांत विस्ताररूप पाणी मिसळून सेवनास व पचनास योग्य अशा रूपांत गीतामृत जिज्ञासूपुढें ठेविलें आहे.

ज्ञानेश्वरांच्या श्रोत्यांस हें दूध मानवलें पण उत्तरोत्तर अनेक कारणांस्तव बुद्धिमांद्य–विशेषतः परमार्थविषयक–वाढल्यामुळें हें ज्ञानेश्वरनिर्मित दूध पचविण्यास जड पडूं लागलें. या कारणानें विषय सुस्पष्ट करण्यासाठीं आणखी थोड्याशा विस्ताराची आवश्यकता निर्माण झाली आहे परंतु हा विस्तार ज्ञानेश्वरीची मराठी भाषा व आजची मराठी भाषा यांचा समन्वय करण्याइतपत नियमित हवा.

पण अनुभव काय येतो ? ज्ञानेश्वरीचा सूक्ष्म, सांगोपांग व शास्त्रशुद्ध व्यासंग असलेले विद्वान आजहि आहेत व त्यांच्या अधिकाराची बाब सुद्धां शंकातीत आहे. त्यांच्याबद्दल योग्य आदर प्रकट करून असें म्हणावें लागतें कीं, त्यांच्या ज्ञानेश्वरी प्रवचनाचा विस्तार कांहीं प्रसंगीं अनावश्यकतेने होतो. एका ओवीतील एकाक्षरी एकच पदावर दीड तास व तरी अपूर्णच व महिन्यांतील सुमारे पंधरा दिवसांच्या प्रतिदिनीं एक तासाच्या अवधींत एका अध्यायाच्या सुरवातीच्या सुमारे फक्त १२ ते १५ ओव्या अशीं प्रवचनें लेखकाच्या श्रवणांत आहेत व त्याच्यामतें या प्रमाणांत

व्याख्यान विस्तार अनावश्यक आहे. प्रवचनाच्या गृहीत अर्थानें ही व्याख्यानें विद्वत्ताप्रचुर असतात यांत वाद नाहीं परंतु प्रवचनाचा विषय ज्ञानेश्वरी हा असेल तर श्रवणाच्या अखेरीस श्रोत्यास आपणास अल्पांशाने कां होईना, ज्ञानेश्वरी विषय कळला असें समाधान मिळालें पाहिजे, असें लेखकाचें नम्र मत आहे.

ब्र. सद्गुरु श्री साखरे महाराज यांचें असें म्हणणें असे कीं, ज्ञानेश्वरी प्रवचन म्हटलें म्हणजे एक तासांत विषयाच्या गहनतेनुसार सुमारे १५ ते ४० ओंव्यापर्यंत, अथवा सरासरीने २५ ओंव्यापर्यंत निरूपण झालें पाहिजे व वर म्हटल्याप्रमाणे ज्ञानांत भर पडल्याचा श्रोत्यांस आनंद झाला पाहिजे. जरी ब्र. साखरे महाराज पुण्यांतील त्यांच्या स्वतःच्या श्री ज्ञानेश्वरी वाचन मंदीराखेरीज फारशीं जाहीर प्रवचनें करीत नसत तरी १९४३ सालापासून त्यांच्या निर्याणापर्यंतच्या ८।१० वर्षांच्या कालांत त्यांचीं मुंबईत जीं थोडी फार प्रवचनें झालीं त्यांतील बऱ्याचशा वेळीं उपस्थित राहाण्याची लेखकास संधि मिळाली होती व प्रवचनाच्या अखेरीस अनेक श्रोते अनाहूतपणें त्यांच्या प्रवचनांबद्दल आदरभाव दाखवून कांहींतरी नवें ऐकल्याचें समाधान व्यक्त करीत. वस्तुतः ब्र. साखरे महाराज आपल्या प्रवचनांना अनुवाद असेंच म्हणत.

## ज्ञानेश्वरी कशी वाचावी ?

एक पाश्चिमात्य लेखक लीओ टॉलस्टॉय यांचा 'बायबल कसें वाचावें ?' या विषयावर एक निबंध आहे, त्यांतील सूचना ज्ञानेश्वरी (आणि इतर कोणत्याही) वाचनास उपयुक्त असल्यानें त्या निबधांतील 'बायबळ' या पदाच्या ठिकाणी प्रस्तुत 'ज्ञानेश्वरी' हें पद ठेवून थोडक्यांत अनुवाद केला आहे.

ज्ञानेश्वरी मराठींतच असल्यामुळे प्रथम वाचनांत अगदींच अर्थबोध होणार नाहीं अगर झाल्यास फार अल्पांशाने होईल असें गृहीत धरलें तरी वर्णोच्चारास तरी अडचण पडणार नाहीं. तेंव्हां पहिल्या वाचनांत जो भाग अल्पस्वल्प समजला असेल त्यावर विशिष्ट खुणा कराव्या. दुसऱ्या वाचनाच्या वेळीं पूर्वी खुणा केलेला भाग वगळावा. पहिल्यापेक्षां या वाचनांत आणखी कांहीं नवें समजेल. या नवीन समजलेल्या भागावरही खुणा कराव्या, परंतु त्या पहिल्यावेळीं केलेल्या खुणांपेक्षां निराळ्या पद्धतीच्या असाव्या, अशा-करितां कीं कोणता भाग कोणत्या वाचनांत समजला हें भविष्यकाळांत समजण्यास सोपे जावें. अशा प्रकारें दुसरें वाचन पुरे झाल्यावर तिसऱ्या वाचनास प्रारंभ करावा. पुन्हां पहिल्या दोन वेळीं समजलेला भाग गाळणें व निराळ्या प्रकारच्या खुणा नवीन समजलेल्या भागासाठीं असा क्रम ठेवावा. याप्रमाणे अशा वाचनांच्या क्रमाने वाचकांस उत्तरोत्तर आपणांस ज्ञानेश्वरीविषय अधिकाधिक समजत गेल्याचें समाधान मिळेल व प्रसंगवत् समग्र विषय साकल्याने आत्मसात् होईल.

**परंतु ही गोष्ट चुटकीसरशी (over night) होण्यासारखी नाहीं. यास चिकाटी पाहिजे. अनुष्ठान पाहिजे. या योगानें यथाकाल अक्षरेंच प्रसाद करतील.**

वरील विवेचन स्वयंबुद्धी वाचकांसंबंधानें झालें. वाचनास सांप्रदायाची जोड म्हणजेच सांप्रदायिक मार्गदर्शन असेल तर अपेक्षित प्रमाणांत ज्ञानेश्वरीविषय समजण्याची कालमर्यादा अभ्यासकाच्या धारणेप्रमाणे बरीच अलिकडे येऊं शकेल.

याहीपेक्षां श्रेष्ठ प्रतीचा वाचक म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांच्या सहाव्या अध्यायांतील 'सिद्धप्रज्ञ' होय. याचें वर्णन करतांना महाराज लिहितात :— 'मोटकी देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पाहांट फुटे। सूर्यापुढे प्रकटे। प्रकाशु जैसा॥ तैसी दशेची वाट न पाहतां। वयसेचिया गांवा न येतां। बालपणींच सर्वज्ञता। वरी तयातें॥ तिथे सिद्ध प्रज्ञेचेनि लाभे। मनचि सारस्वते दुभे। मग सकळ शास्त्रे स्वयंभे निघती मुखे॥ (ज्ञा. अ. ६–४५२–५४) अर्थात अशा सिद्धप्रज्ञाचें अस्तित्वच दुर्मिळ. त्यांतूनही जेथें कोठें तो असेल त्यास पाहाण्यास लागणारी विशिष्ट दृष्टि आम्हांसारख्या सामान्यांच्या ठिकाणीं नसल्यामुळें अशा सिद्धप्रज्ञ उमगून येत नाहीं. सामान्य जन त्यासही आपल्याच मापानें मोजतात. परंतु ज्ञानेश्वर महाराजांनींच म्हटल्याप्रमाणे 'तैसे हारपले आपणपे फावे। तै संतांते पाहतां गिंवसावे। म्हणोनि वानावे ऐकावे। तेन्चि सदा॥' (ज्ञा १८–४००) अशा महात्म्यांचे गुणवर्णन करून व ऐकून त्यांच्या प्रसाद भिक्षेची इच्छा बाळगणे हें तरी आपल्या हातीं आहे व एकंदर प्राप्त परिस्थितींत तेंच करणें आपणांस श्रेयस्कर आहे.



○ ○ ○ एकांताचें सुख देईं मज देवा। आघात या जीवा चुकवोनीं॥
ध्यानीं रुप, वाचें नाम निरंतर। आपुला विसर पडोनेदी॥
माय बाळा भेटी, सुखाची आवडी। तैशी मज गोडी देईं देवा॥
कीर्ति ऐकोनियां आलों शरणांगत। दासाचें तूं हित करितोसी॥ १॥

—तुकाराम.

# सुख, समाधान व शांति

प्रत्येकास स्वाभिमान असतो. मग तो लहान असो मोठा असो. यासाठीं केव्हांही कोणाचा अपमान करूं नये. त्यामुळें दुसऱ्याचें अंतःकरण दुखविलें जातें. त्याच्या आत्म्याला आघात पोहोंचतो, आणि त्यामुळें आपला पुण्यांश कमी होतो. देवाच्या दरबारीं अशा माणसाला सहसा स्थान मिळणार नाहीं. अपमान करणाऱ्याच्या ठायीं अभिमान असतो. अभिमान मग तो कोणत्याही प्रकारचा असो; तो नाशाला कारण होत असतो. कोणत्याही क्षेत्रांत प्रभुत्व किंवा वैभव प्राप्त होतें त्याचें कारण गांठीला पुण्याचें बळ असतें हेंच होय. अधिकाराच्या किंवा वैभवाच्या बळावर खालच्या पायरीवर असलेल्यांचा, दीन दुबळ्यांचा अपमान करणें श्रेयस्कर नव्हे. केव्हांही कोणाचा अपमान करायचा नाहीं, हें एक व्रत आहे. विशेषतः लहान मुलेंबाळें, वृद्ध माणसें, आश्रित, स्त्रिया, दीनदुबळे, दुःखी व रोगानें पछाडलेले अशा असहाय्य लोकांचा आपल्याकडून अपमान होणार नाहीं, याबद्दल खबरदारी घेण्यांत यावी. आपल्या हृदयांत जो परमेश्वर वास करीत आहे तोच सर्वांठायीं असतो. यासाठीं आपण सर्वांना मानसन्मानानें वागवावयाचें. दानाचे प्रकार अनेक आहेत परंतु दुसऱ्यास मान देणें, त्याला आदबीनें वागविणें हें सर्वांत मोठें दान आहे; कारण त्यामुळें त्याचा आत्मा प्रसन्न होत असतो. आणि ती प्रसन्नताच आपणास प्रेरक व उपकारक होऊन रहात असते.

× × ×

जाणतेपणीं किंवा अजाणतेपणीं आपल्या आई वडिलांचें मन दुखवूं नका. त्यामुळें त्यांच्या ध्यानींमनीं असो वा नसो; त्यांच्या अंतःकरणांतून शापवाणी बाहेर पडेल आणि तीच तुमच्या दुःखाला कारण होईल. तुमच्यावर ईश्वराचा कोप होईल. ‘ माझ्या आईबापाला काय समजतें आहे ? त्यांच्यापेक्षां किती झालंय माझें शिक्षण ! ’ या विचारानें त्यांचा केव्हांही अपमान करू नका. त्यांच्या नेत्रांतून निघालेल्या एखाद्या अश्रूनें तुमचें ज्ञान आणि तुमचें वैभव धुळीला मिळेल याची आठवण सदासर्वकाळ हृदयांत बाळगा. ज्या शिक्षणामुळें धनदौलत मिळते तें शिक्षण तुम्हीं जास्त प्रमाणांत संपादन केलें असाल; ज्या ज्ञानामुळें खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करतां येतें तें ज्ञान तुम्हीं विशेष प्रमाणांत मिळविलें असलें तरी तें ज्ञान आपल्या आईवडिलाशीं सरशी करण्यास असमर्थ आहे. खरें शिक्षण कोणतें ? ज्याच्या सहाय्यानें अंगीं नम्रता येते व भगवंताकडे लक्ष लागतें तेंच. खरें ज्ञान

कोणतें ? ज्यामुळें भगवंताची ओळख पटते तें. धर्म, सत्य व तपस्या हीच या जीवनांतील महान् संपदा होय. जिला आपण संपत्ति समजतों ती चिंता, क्लेश, दुःख व गर्वाला कारण होणारी असते; आणि तिच्यापायीं आपण जन्म मरणाच्या फेऱ्यांत सांपडतों.

× × ×

दगडाच्या मूर्तींत आपण देव पहातों त्याचप्रमाणें हाडामासाच्या शरिरांत मातापित्याच्या रूपानें परमात्मा वास करीत असतो. मातापिता व गुरुजन, वडील माणसें व बालबालिका यांना आपण मानसन्मानानें वागविलें पाहिजे. त्यांचा शब्द आपण झेलला पाहिजे व त्यांना नेहमीं आनंद दिला पाहिजे. तो आनंदच आपल्या उत्कर्षाला कारण होणारा असतो. त्यामुळें आपण भगवंताची कृपा संपादन करूं शकाल.

× × ×

पुष्कळ गोष्टी ऐकिल्या व वाचल्या; त्या लक्षांत ठेवणें व त्यांचें आचरण करणें महाकठीण वाटतें का ? मग एकच गोष्ट सांगूं ? मन नेहमीं प्रसन्न ठेवावें. आपलें मन प्रसन्न राहील असें बोलावें, वागावें व वर्तावें. ज्याच्या अंतःकरणांत भय, चिंता किंवा रागद्वेष नाहीं, जो शांत व सदाचारी असतो, तोच सदासर्वकाळ प्रसन्न राहूं शकतो. कोणतीही गोष्ट करण्यापूर्वीं एकच विचार करा कीं, त्यामुळें माझ्या मनाच्या प्रसन्नतेला धक्का पोहोंचणार नाहीं ना ? ज्यानें मनाची प्रसन्नता संपादन केली, त्याची बुद्धि सदासर्वकाळ स्थीर असते व त्याच्या चेहऱ्यावरही शांतपणाच दिसून येईल. नेहमीं मन प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करा; त्याचा अभ्यास करा. मनांत नाना संकल्प उठतात. ते पूर्ण करण्याच्यामागें लागून तुमचें मन प्रसन्न रहाणार नाहीं. मन कोणत्याही परिस्थीतींत शांत ठेवतां आलें पाहिजे.

× × ×

एक अगदीं साधासुधा नियम सांगून तो आचारणांत आणतां आला तर तुम्हीं सहजासहजीं तरून जाल. दुसऱ्याची निंदा करावयाची नाहीं व कोणी केली तर ती कानावर घ्यायची नाहीं. जो हजर नाहीं त्याच्या दोषांचा पाढा वाचणें ही निंदाच झाली. तिच्या वाटेला आपण जायचें नाहीं. तें अधःपतन होय. कितीही मोह होवो. अशा गोष्टींपासून आपण कटाक्षानें शक्य तेवढें दूर रहायचें असा नियम करून तो पाळण्यासाठीं सतत झटा. त्यामुळें तुम्हांला सुख, समाधान व शांतता लाभेल.

---

**उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ‘ लायसॉफ तेल ’ वापरा**

# काहीं प्रश्न आणि उत्तरें

प्रश्न—दुःखाचें मूलभूत कारण कोणतें ?

उत्तर—असमाधान.

प्रश्न—मानवानें देवापाशीं कशासाठीं प्रार्थना करावी ?

उत्तर—स्वतःची व इतरेजनांची निष्ठापूर्वक सेवा करण्याची सुसंधी लाभावी यासाठीं.

प्रश्न—आपली सर्वांत जास्त हानी कशामुळें होते ?

उत्तर—अहंकारामुळें !

प्रश्न—सर्व दुःखांवर विजय कोण मिळवूं शकतो ?

उत्तर—जो सर्वस्व देऊन मोकळा होतो, म्हणजेच सर्वत्यागी.

प्रश्न—या जगांत कशाचें मूल्यमापन बरोबर करतां येणार नाहीं ?

उत्तर—योग्यवेळीं योग्य तें सहाय्य करणाऱ्याचें.

प्रश्न—हें जग कोण जिंकू शकेल ?

उत्तर—जो सत्यानें व सबुरीनें वागूं शकेल तो.

प्रश्न—जग कोणासभोंवार घिरट्या घालतें ?

उत्तर—जो सत्यवचनी, मधुरभाषी व नम्र आहे त्याच्याभोंवती.

प्रश्न—खरा मित्र कोणाला समजावें ?

उत्तर—जो दुराचारापासून व दुष्कृत्यापासून तुम्हांला दूर ठेवील तो.

प्रश्न—सज्जन माणसानें कोणत्या गोष्टी बोलण्याचें टाळावें ?

उत्तर—असत्य व दुसऱ्यांच्या उणीवा.

प्रश्न—आपला सर्वांत मोठा शत्रू कोण ?

उत्तर—लोभ.

प्रश्न—प्राणापेक्षांहि प्रिय गोष्टी कोणत्या ?

उत्तर—आपला परंपरेनें चालत आलेला धर्म व सत्संगती.

प्रश्न—कोणाच्या संरक्षणाची सर्वांत जास्त काळजी घ्यावी ?

उत्तर—आपला नांवलौकीक, आपलें मन व सद्गुणी स्त्रिया.

प्रश्न—सर्वांत वांछनीय गोष्ट कोणती ?

उत्तर—हरिनामाची आवड.

प्रश्न—या जगांत भरभराट कोणाची होते ? आणि नुकसान कोणाचें होतें ?

उत्तर—जो नम्र झाला भूतां त्याची भरभराट होते व जो बेमुर्वतखोरपणें वागतो त्याच्यावर प्रत्येक आघाडीवर गमावून बसण्याची पाळी येते.

प्रश्न—गोड फळें कोणाच्या श्रमाला येतात ?

उत्तर—जेथें श्रद्धा व शिस्त आहे त्याच्या.

---

# संत करमैतीबाई

अनुवादक : भवानीशंकर नीळकंठ वागळे

नश्वर पति–रति त्यागि कृष्ण पदसों रति जोरी ।
सबैजगतकी फाँस तरकि तिनुका ज्यों तोरी ॥
निर्मल कुल काँथडा धन्य परसा जेहि जाई ।
करि वृन्दावन–वास सन्त–मुख करत बडाई ॥
संसार–स्वाद–सुख त्याग करि फेरि नहीं तिन–तन चही ।
कठिन काल कलियुगमहँ करमैती नि–कलँक रही ॥

—भक्त दामाजी

ज्याचं मन त्या नंदनंदन श्यामसुंदर श्रीकृष्णाच्या मनमोहक मुखारविंदावर मोहीत होतें, त्याला जगांतलं सारं सुख कःपदार्थ आहे असं वाटतं. त्याला साऱ्या संसाराचं सुख विषवत् वाटतं. संसारांतले विषय जर भगवत्प्रेमाला सहाय्यक असतील व पूज्य भगवताच्या पूजासामुग्रीच्या कार्यासाठींच वाहिलेले असतील तर तशा संसारांत राहण्यांत सुख असून, प्रियप्रभूच्या पदकमलांची पूजा सार्थकीं लागते. आणि म्हणून एकतर भक्तगण साऱ्या संसाराचें भगवत्पूजेच्या सामुग्रींत रुपांतर करतात किंवा संसाराचा सर्वथा परित्याग करतात. दोन्ही प्रकारच्या भक्तांना विषयांच्या आसक्तीचा परित्याग करावा लागतो. जे कांहीं थोडे विषय शिल्लक राहतात ते भोगाच्या रुपानें राहात नाहींत. प्रभुचरणावर जे स्वतःला समर्पण करून घेतात त्यांच्यापासून विषय दूर दूर जातात व 'देव माझा, मी देवाचा' अशी त्यांची मनःस्थिती होते.

आपली चरित्रनाईका संत करमैतीबाई हिनें वर नमूद केलेल्या स्थितीला पोंहोचून पिता व पतिगृहाचा त्याग करून वृंदावनाचा रस्ता धरला. आपण आतां करमैतीच्या गांवांत जाऊन शेवटपर्यंत तिच्या सत्संगतीचा लाभ घेऊं. चला.

## करमैतीचें बालपण

जयपूरच्या मध्यभागांत खंडेला या नांवाचें एक ऐतिहासिक स्थान आहे. येथें सेखावत सरदार राज्य करीत होते. पंडित परशुरामजी खंडेला राज्याचे कुलपुरोहित होते. करमैती त्यांची एकुलती एक सद्गुणी कन्या होती. पूर्वसंस्कारामुळें करमैतीचें चित्त बालपणापासूनच शामसुंदरवर लागलें होतें. ती दिनरात श्रीकृष्णाच्या नांवाचा जप

करीत होती व एकांतस्थळीं 'हे नाथ, हे नाथ' या नांवानें तिचा नामघोष चाललेला असे. तिच्या नेत्रांतून अश्रुवर्षाव होत असे व शरीर पुलकीत होत होतें. प्रेमावेशामध्यें ती कधीं रडे व कधीं उंच स्वरांत सुरेल आवाजानें कीर्तन करीत असे. लहान बालिकेचें निःस्वार्थी भगवत्प्रेम पाहून घरांतले व आसपासचे लोक चकित होत होते व त्यांचें अन्तःकरण आनंदानें भरून येई. हळूहळू करमैती विवाहयोग्य वयाची झाली व तिचे आईबाप तिच्यासाठीं सुयोग्य वर शोधूं लागले. परंतु करमैतीबाईला आपल्या विवाहाची चर्चा सहन होत नसे. ती लाजेमुळें मातापित्याच्या समोर कांहीं बोलत नसे, परंतु विषयाच्या गोष्टी तिला विषवत् वाटत. अखेर तिच्या इच्छेविरुद्ध तिचा विवाह तिच्या पित्यानें करून टाकला. परंतु करमैतीनें आपल्या विवाहाच्या पूर्वी—नव्हे—पूर्वजन्मीं स्वतःला भगवंताला अर्पण केलें होतें. भगवंताला अर्पण केलेल्या वस्तूंवर दुसऱ्याचा अधिकार ती कशी सहन करणार? ती तर संसारसागराच्या पलिकडे असलेल्या दिव्य प्रेमराज्याचा परमेश्वर श्यामसुंदर श्रीकृष्णाला वरून दिनरात त्याचेंच चिंतन करीत होती. असेच कांहीं दिवस गेल्यानंतर करमैतीबाईच्या सासरकडील माणसें तिला सासरीं घेऊन जाण्यासाठीं आलीं. तिला असं कळून चुकलं कीं, तिच्या सासुरवाडींतील माणसें ईश्वराला मानीत नाहींत व तीं साधु—संतांच्याहि विरुद्ध आहेत. तेथें गेल्यास आपणांस आपल्या उपास्य दैवताच्या सेवेला वाव मिळणार नाहीं व आपल्या मनाला व शरीराला विषयवासनेंत खिचपत पडावें लागेल; याप्रमाणें करमैतीच्या मनांत विचारतरंग येऊं लागले व ती फार कष्टी झाली. मनांतल्या मनांत तिनें भगवंताचें स्मरण करून म्हटलें, 'नाथ' या भयंकर आपत्तींतून मला वांचीव रे! ही तुझ्या पायाची पवित्र दासी आज जबरदस्तीने विषयकर्दमाच्या वाटेकडे लोटली जाणार! भगवंता! या तुझ्या एकनिष्ठ दासीला असा एखादा रामबाण उपाय सुचव कीं, ज्यामुळें मी तुझ्या व्रजधामामध्यें सुरक्षीतपणें पोंहचून तेथल्या पवित्र धूळीला माझ्या शिरावर धारण करूं शकेन!'

## गृहत्याग केला

घरांत करमैतीचे आई—बाप आपल्या मुलीला सासरीं पाठविण्याच्या तयारीस लागले असतांना, करमैती दुसऱ्या एका विचारांत मशगूल झाली होती, आणि रात्रीं जेव्हां सर्व माणसें झोंपीं गेलीं तेव्हां करमैती भगवंताची प्रार्थना करती झाली. अकस्मात तिच्या मनांत स्फूर्ती आली कीं, मनुष्यानें प्रिय भगवंताला कायमचें विन्मुख करणाऱ्या विषयवासनेंत राहणें हा मूर्खपणा आहे. अतएव कांहींही होवो विषयाचा त्याग करणें व वृंदावनवासियाशीं सख्य करणें यांतच मानवाचें कोट कल्याण आहे, असा मनाशीं विचार करून, करमैती मध्यरात्रीच्या सुमारास निर्भयपणें एकटीच घराबाहेर पडली. केवळ परमेश्वर प्राप्तीच्या इच्छेनें रात्रीबेरात्रीं व रानावनांत भटकणाऱ्याला भिती कुणाची वाटणार! यापूर्वी करमैती कधीं घराबाहेर गेली नव्हती. परंतु आज ती मध्यरात्रीच्या समयीं भीती न बाळगतां धांवतच सुटली. तिच्या सोबतीला कोणीही नव्हतें. जो कोणी

होता तो भक्तांचा कैवारी भगवान श्रीकृष्ण व त्याचें एकमात्र कार्य म्हणजे शरणागत भक्तांच्या सन्निध राहून त्यांचें रक्षण करणें हेंच होय.

भगवत्प्रेमांत मस्त असलेली करमैती निबिड अंधाराचा भेद करीत अप्रहितपणें चालतच होती. तिला आपण कोण व आपल्याला जायचें कुठें याचा जवळजवळ विसर पडला होता.

दिसि अस विदिसि पन्थ नहिं सूझा
को मैं कहां चलेउँ नहिं बूझा ॥

करमैती झपाट्यानें चालली होती. रात्रभर किती दूर गेली, याचा तिला थांगपत्ता नव्हता. पहांट झाली. जिकडे तिकडे झुंजुमुंजु दिसूं लागलें. तरीहि ती झोंप व भूक विसरून पळतच सुटली. तूर्त हिचा आपण पाठलाग न करतां हिच्या माहेरीं जाऊं.

सकाळीं करमतीच्या मातेला आपली सुकन्या घरांत कुठेंच दिसेना. थोडावेळ तिनें मुलीचा तपास केला व जेव्हां तिला करमैती कुठेंच सांपडेना तेव्हां ती घाबऱ्या घाबऱ्या आपल्या पतीकडे गेली व तिनें आपल्या पतीला करमैती नाहींशी झाल्याची दुर्घटना कळविली. परशुरामजीला आपली कन्या नाहींशी झाल्याचें ऐकून अत्यंत दुःख झालें. एका बाजूनें मुलीबद्दलचें प्रेम व दुसऱ्या बाजूनें जनलज्जेचें भय ! त्याला नक्की माहीत होतें कीं त्याची कन्या करमैती विषय–विराग व भगवदनुरागामुळे कुठंतरी निघून गेली पण गांवांतले लोक काय काय म्हणतील कोण जाणे ! आपल्या सत्वशील व सुशील कन्येला हे लोक विनाकारण कलंक लावतील, या विषादपूर्ण विचारानें दुःखी होऊन परशुरामजी आपल्या यजमान राजापाशीं गेला राजानें आपल्या पुरोहिताच्या दुःखांत समदुःखी होऊन त्याचें सांत्वन केलें व करमैतीच्या शोधासाठीं चोंहोंबाजूंनीं घोडेस्वार पाठविले करमैती ज्या रस्त्याच्या दिशेनें दोन घोडेस्वार दौड करीत होते. दूरवर घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकतांच करमैती घाबरली व घोडेस्वार आपला पाठलाग करीत नसतील कशावरून असें तिला वाटलें. परंतु आतां लपणार कुठें ? तेथें आसपास झाडेंझुडपें किंवा टेकड्या नव्हत्या. नुसतें खुलें मैदान होतें तें ! अंतीं तिला एक युक्ती सुचली. मैदानांत जवळच एक उंट मरून पडला होता. गिधाडानीं त्याचें पोट फाडून आंतलें मांस खाऊन टाकलें होतें. पोटाचा खोकाच झाला होता तो. करमैती एका क्षणाचाहि विलंब न करतां त्या दुर्गंधयुक्त उंटाच्या पोटांत लपली. तीव्र दुर्गंधीमुळें घोडेस्वार उंटाच्या बाजूकडे वळले देखील नाहींत व ते तेथून निघून गेले. करमैतीला विषयाची दुर्गंधी इतकी सुटली होती कीं तिच्यापुढें मेलेल्या उंटाची दुर्गंधी कांहींच नव्हे. प्रभु–प्रेम–पागल भक्तबालिकेकरितां भगवंतांच्या कृपेनें दुर्गंधाचा सुगंध झाल्यास नवल नाहीं. तीन दिवसपर्यंत करमैती उंटाच्या पोटांत कृष्णप्रभूचें ध्यान करीत पहुडली होती. चौथ्या दिवशीं ती उठून पुढें चालूं लागली. थोड्या दूर अंतरावर तिला एक सोबती मिळाला. तो भक्तांचा कैवारी कृष्णप्रभू तर नसेल ना ! कोणी सांगावें !

करमैती प्रथम हरिद्वारला पोंहोचली व तिथें तिनें भागिरथींत स्नान केलें. त्यानंतर ती पुढें जाऊं लागली व श्रीकृष्णाच्या वृंदावनीं जाऊन पोंहचली. त्या कालीं वृंदावन हें खऱ्या साधूचं व बैराग्यांचं केंद्र होतं, तेथें भारतांतले भगवद्भक्त समूहानें जमत होते. भक्तांनीं वृंदावन पवित्र केलें होतें आणि म्हणूनच साधुसंतांची दृष्टी पवित्र वृंदावनावर खिळून राहिली होती.

## पित्याकडून शोध

वृंदावनाला पोंहचल्यानंतर करमैती आनंदसागरांत बुडून गेली. तिच्या उभ्या आयुष्यांत तिला एवढा आनंद कधींही झाला नव्हता. ती जवळच्या जंगलांत ब्रह्मकुंडावर राहूं लागली. प्रेमसिंधूची मर्यादा सुटून गेल्यामुळें तिचें जीवन अपरंपार प्रेमप्रवाहामध्यें वाहूं लागलें! तिचा पिता परशुरामजी आपल्या कन्येचा शोध करीत करीत वृंदावनाला येऊन पोंहचला. एवढ्या मोठ्या वृंदावनामध्यें करमैतीचा त्याला पत्ता लागणार कसा? जगाच्या पुढें भक्तीचं सोंग दाखविणारी ती कोणी भोंदू बाई नव्हती, ती भक्तवत्सल भगवंताच्या प्रेमांत ध्यानमग्न होऊन जंगलांतच पडून राहिली होती, एके दिवशीं परशुरामजीनें झाडावर चढून पाहिलें; तोंच त्याला ब्रह्मकुंडावर एक बालबैरागीण दिसली व तो झाडावरून उतरून तडक ब्रह्मकुंडावर गेला. त्याला तेथें काय बरें दिसलें? त्याची कन्या करमैती साधुवेशांत ध्यानमग्न स्थितींत बसलेली असून, तिच्या पवित्र मुखावर निर्मल शीतल तेज चमकत आहे व तिच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचा प्रवाह अविरत वाहत आहे; असा हा देखावा पाहून तो हर्ष–शोकांत डुबून गेला. आपल्या कन्येच्या बाह्य अवस्थेकडे पाहून तो शोकमग्न झाला होता व तिचें निश्चल भगवत्प्रेम पाहून त्याला आनंद झाला होता. तो स्वतःला अशा भक्तिमग्न मुलीचा पिता म्हणून धन्य मानून घेत होता.

परशुरामजीला तेथें बसल्याला बराच काल उलटून गेला. तो आपल्या मुलीची समाधिवत् अवस्था पाहून बेचैन झाला पण करमैती जागी झाली नाहीं. अखेर परशुरामजीनें तिला हालवून हालवून सावध केलें व त्यानें तिला आपल्या घरी येऊन तेथेंच भजन पूजन चिंतन करण्याचा आग्रह केला. करमैती नम्रपणें म्हणाली, 'बाबा, येथें येऊन कोणी परत स्वगृहीं गेलेला आहे काय? आणि मी तर त्या घननीळाच्या प्रेमसागरांत पुरती बुडून स्वतःलाच विसरून गेलें आहे. मी जिवंत असून मेलेलीं आहे. हा मुडदा आतां येथून कसा उठणार? तुम्हीं आतां आपल्या घरीं जा व माझ्या मातेसह श्रीकृष्णाचें भजन, पूजन, नामस्मरण करा. श्यामसुंदरासारखें सुखाचे स्थान त्रैलोक्यांत सांपडणार नाहीं. बाबा, जा आतां.' असें म्हणून करमैती भगवंताचें गीत गात गात भावावेशांत मूर्च्छित झाली. ब्राह्मण परशुरामजीनें आपल्या वैषयीक संसारी जीवनाला धिक्कार असो असें म्हणून करमैतीला शुद्धीवर आणलें व श्रीकृष्ण भजनाला वाहून घेण्याची प्रतिज्ञा करून, त्यानें आपल्या मुलीचा अश्रुनयनानें निरोप घेतला. नंतर तो स्वग्रामीं निघून गेला. स्वगृहीं पोंहचतांच परशुरामजीनें आपल्या पत्नीला मुलीचा

क्षेमसमाचार कळविला व डोळ्यांत आसवें आणून म्हटलें, ' लाडके, अशाप्रकारचं पवित्र संतान तुझ्या कुशींत जन्माला आलं, धन्य आहेस तूं ! आज आमच्या कुलाचा उद्धार झाला !'


## राजाला उपरती झाली

राजाला हा समाचार कळतांच राजा स्वतः करमैतीच्या दर्शनासाठीं वृंदावनाला निघून गेला. राजानें वृंदावनाला पोहोंचतांच करमैतीची ती प्रेमपूर्ण अवस्था पाहिली. राजाचें मस्तक भक्तिभावनेनें तिच्या चरणावर सहज झुकलें गेलें. राजानें तिच्यासाठीं कुटीर बांधून देण्याचें ठरविलें व तिची त्याबद्दल परवानगी मागितली, परंतु करमैती त्याला कबूल होईना. राजानें जेव्हां हट्टच धरला तेव्हां ती कुठें कबूल झाली. राजानं कुटीर बांधलं. असं समजतं कीं, करमैतीबाईच्या कुटिराचा अवशेष अजूनहि वृंदावनाच्या ब्रह्मकुंडावर पहावयास सांपडतो.

करमैती मोठ्या त्यागभावानें राहत होती. तिचं मन क्षणाक्षणाला श्रीकृष्णरुप होऊन ती भावमग्न स्थितींत राहत होती. तिचे नेत्र नेहमीं पाण्यानें भरलेले असायचे. तपस्विनी करमैती बाईनें परम तप करीत करीत अंतीं वृंदावनाच्या पवित्र भूमींत आपला पवित्र देह ठेवला व ती श्रीकृष्णरूप झाली. श्यामसुंदर श्रीकृष्णाच्या चरणीं अनंत प्रणाम.

मूकं करोति वाचलं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्द माधवम् ।। १ ।।

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।
प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः ।। २ ।।



○ ○ ○ विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।
आईकाजी तुम्हीं भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।
कोणाही जीवाची न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुखदुःख जीव भोग पावे ।।

# संपदा म्हणजे संकटपरंपरा

**संपत्तीच्या लोभापायीं मनुष्य आपली राखरांगोळी करून घेतो. सुख हावरेपणांत नाहीं तर आहे त्यांत समाधान मानून रहाण्यांत आहे. महामना बुद्धाच्या चरित्रांतील पुढील घटनेवरून प्रत्येकानें योग्य तो बोध घ्यावा.**

ही जुन्या जमान्यांतील एक घटना आहे. काशी राज्यांतील एका गांवीं रहाणारा कोणी एक ब्राम्हण वैदर्भ मंत्रांत पारंगत होता. त्या मंत्राचें महत्त्व सांपत्तिक दृष्ट्या फार मोठें आहे. एका विशिष्ट नक्षत्रयोगावर त्या मंत्राचा जप केला असतां आकाशांतून सात प्रकारच्या रत्नांचा वर्षाव होत असे.

एके दिवशीं कांहीं कामानिमित्त तो ब्राम्हण महात्मा बुद्ध यांच्यासह चेदीराज्यांतील एका गावीं जात होता. वाटेंत एक मोठे जंगल लागलें. त्या जंगलांतील चोर मोठे वस्ताद होते. त्यांना प्रेषणक म्हणत असत. छापा घालून दोघांना पकडायचे व त्यांपैकीं एकास आपल्याजवळ ठेऊन दुसऱ्यास द्रव्य घेऊन येण्यासाठीं मोकळा सोडीत असत. तो दुसरा वाटसरू द्रव्य घेऊन येईपर्यंत पहिल्याची सुटका होत नसे. यावेळीं त्यांनीं वैदर्भ मंत्र जाणणाऱ्या ब्राह्मणास आपल्याजवळ ठेऊन बुद्धाला द्रव्य घेऊन येण्यासाठीं पाठविलें. जातेवेळीं बुद्धदेव ब्राह्मणास नमस्कार करून म्हणाले 'मी एक दोन दिवसांत द्रव्य घेऊन परत येईन तूं घाबरूं नकोस किंवा चिंता करूं नकोस. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेव. आज धनाचा वर्षाव होणाऱ्या नक्षत्राचा योग आहे. भीतीने गांगरून जाऊन कोणत्याही परिस्थितींत त्या मंत्राचा उपयोग करूं नकोस. तो मोह टाळ. त्या मंत्राचा जप केलास तर तुझ्यासह ते चोरही संकटांत सांपडतील. तेव्हां माझ्या विनंतीकडे कृपा करून दुर्लक्ष करूं नकोस.' याप्रमाणे सांगून बुद्धदेव तेथून निघाले.

सूर्यास्त होतांच चोरांनीं त्या ब्राम्हणास एका झाडास दोरखंडांनीं गच्च बांधून ठेविलें. आकाशांत पूर्ण चंद्राचा उदय होऊं लागला होता. शीतल चांदण्याचा वर्षाव होत होता; परंतु ब्राम्हण भीतीने गांगरून गेला होता. त्यानें आकाशाकडे पाहिलें. हवा तो नक्षत्र योग जुळून येत होता. शरिरास असह्य वेदना होऊं लागल्या होत्या. या दुःखांतून मुक्त होण्याची ही नामी संधी आहे. पुढचे कोणी सांगावे. ह्या प्राप्त योगाचा उपयोग करून घ्यावा, त्या चोरांस खूश करून आपली सुटका करून घ्यावी, अशी त्याला बुद्धि झाली. कांहीं क्षण विचारांत घालवून त्याने चोरांस हांक मारली व म्हणाला, 'बाबांनो! तुम्हांला धन दौलतच पाहिजे ना? मग मला सोडा; मला स्नान करून शुचिर्भूत होऊं द्या व मला मंत्राचा जप करूं द्या. मग पहा! तुमच्यापुढे धनाच्या राशी दिसूं लागतील!

चोरांच्या तोंडाला पाणी सुटलें ! आणि कां नाहीं सुटणार ? ब्राह्मणाने सांगितल्या-प्रमाणें त्यांनीं सर्व कांहीं केलें. मंत्र, जप सुरू झाला. ब्राह्मणाने आकाशाकडे पाहिलें तों काय ? रत्नांचा वर्षाव सुरू झाला. मोठ्या आनंदाने त्या रत्नराशी जमा करून ब्राह्मणाची चौकशी न करतां ते चोर आगेकूच करूं लागले. ब्राह्मणहि त्यांच्या मागून आस्ते आस्ते जाऊं लागला.

ती चोरांची टोळी कांहीं अन्तरावर चालून गेल्यानन्तर त्यांना चोरांच्या दुसऱ्या टोळीने गांठलें. चोरावर मोर असायचाच. पहिल्या टोळीच्या पुढाऱ्यानें विचारलें, 'आमच्यावर हल्ला कशासाठीं करतां ?'

'तुमच्याजवळची धनदौलत आम्हांला पाहिजे !'

'एवढेंच ना ? मग आमच्याऐवजीं आमच्या मागोमाग येणाऱ्या ब्राह्मणाला पकडा ! आकाशाकडे पहाण्याची खोटी ! द्रव्याच्या व रत्नांच्या राशी कोसळूं लागतात ! त्याच्यामुळेंच ही सारी धनदौलत आम्हांला मिळाली.'

त्या हल्लेखोरांनीं त्यांना सोडून दिलें व ब्राम्हणास पकडलें व त्याला म्हणाले, 'आम्हांलाहि धन पाहिजे; पहा आकाशाकडे आणि म्हण तो मंत्र !'

ब्राम्हण काय करणार ! तो म्हणाला, 'उठतां बसतां व वाटेल तेव्हां आकाशाकडे पाहून मंत्र म्हटल्याने रत्नांचा वर्षाव होत नाहीं. वर्षांतून एखाद्यावेळीं येणाऱ्या नक्षत्रयोगावर मंत्रजप केल्यानें त्याचें फळ मिळतें. तो योग येऊन गेलेला आहे.'

त्याचें हें म्हणणें त्या चोरांना पटले नाहीं. हा ब्राम्हण कांहींतरी बहाणा करीत आहे, या समजुतीने त्यांनीं तरवारी उपसल्या व त्याला निजधामास पाठविलें. त्याचप्रमाणें पुढे निसटलेल्या चोरांचा पाठलाग करून व झटापटींत त्यांना ठार करून त्यांच्या जवळची सारी संपदा हस्तगत केली. ब्राम्हणाचा व चोरांच्या एका टोळीचा निकाल लागला. नंतर दुसऱ्या टोळींतील लोक वाटे करतांना, आपसांत झगडूं लागले. त्या झगड्यांत शेवटीं दोघे शिल्लक राहिले. त्यांनीं सारी धनसंपदा ताब्यांत घेतली. किती आनंद झालाय त्यांना ! धांवपळ करीत ते एका गांवाजवळ आले. सायंकाळ झालेली होती. भुकेने जीव व्याकूळ झाला होता. त्या दोघांपैकीं एकाने दौलतीचे रक्षण करीत रहाण्याचा भार स्वतःवर घेतला व त्याचा सहकारी बाजारांत मिठाइ व खाद्य पदार्थ खरेदी करण्यासाठीं गेला.

इकडे द्रव्यराशीजवळ बसलेला चोर विचार करीत होता कीं, सारा जन्म चोऱ्या माऱ्या करण्यांत घालविला. बाजारांत गेलेला सोबती आला म्हणजे ह्या द्रव्यराशीचे दोन भाग होणार. सारी संपदा मला एकट्यालाच मिळाली तर मी पिढ्यान्‌पिढ्या सुखी होईन. तेव्हां सोबती येतांच तरवार चालवायची म्हणजे आपोआप साऱ्या संपदेचा मी एकटाच मालक होईन.

बाजारांत गेलेल्या सोबत्याने मेवामिठाई खरेदी केली. त्याच्याही सुपीक डोक्यांत तेच विचार आले. मात्र आपल्या सोबत्याचा अंत घडवून आणण्यासाठीं त्याने मिठाइ-बरोबर कांहीं वीष खरेदी करून तें मिठाईत मिसळविलें.

मिठाईचा करंडा डोकीवर घेऊन तो आपल्या सोबत्याजवळ आला व करंडा खालीं ठेवण्यासाठीं वाकत असतां त्याच्यावर तरवारीचे घाव पडले. त्या दोघांपैकीं एकाचें आयुष्य संपलें. मागें राहिलेल्यानें मिठाईचा यथेच्छ समाचार घेतला. व आपली जीवनयात्रा संपविली ! एका मागून एक सर्वांचा निःपात झाला व द्रव्यराशी तेवढ्या जाग्यावर राहिल्या. काय त्यांचा उपयोग ?

बुद्धदेव कोणी तरी दिलें तें द्रव्य घेऊन चोरांना देण्यासाठीं परत आले तेव्हां त्या मूळ जागीं कोणी नव्हते. त्यांना आश्चर्य वाटले. पुढें जातां जातां वाटेंत इकडे तिकडे विखुरलेलीं रत्नें दिसलीं; तेवढ्यावरून त्यांना काय घडले असेल याची कल्पना करतां आली. आणखी पुढे गेल्यानंतर जागोजाग पडलेलीं प्रेते व शेवटीं धनाची रास आढळून आली.

एकांत स्थळीं एका शीलेवर बसून बुद्ध या घडलेल्या घटनेचे दुवे एकत्र जुळवायला लागले, तेव्हां संपत्तीच्या लोभानें कसकसा घातपात केला याची एक सांखळी त्यांना निर्माण करतां आली व आपल्या शिष्यांपुढे ठेवतां आली.

## संतांचें सहज सत्यवादित्व

● ● ● सूर्य उगवतो. परंतु "मी आतां अंधार दूर करीन, पाखरांना उडायला लावीन, लोकांना कर्मे करावयास प्रवृत्त करीन." असें का त्याच्या मनांत असतें ? तो उगवतो, तेथें उभा राहतो. त्याचें तें अस्तित्व विश्वाला चालना देतें.. परंतु सूर्याला त्याचें भान नाहीं. तुम्ही जर सूर्यास म्हणाल, "बा सूर्या, तुझे अनंत उपकार ! तूं कितीं अंधार दूर केलास !" तर तो सूर्य बुचकळ्यांत पडेल. तो म्हणेल, "चिमूटभर अंधार मला आणून दाखवा. मग तो जर मला दूर करतां आला तर मी म्हणेन कीं हें माझें कर्तृत्व !" अंधार सूर्याकडे घेऊन जाता येईल का ? सूर्य म्हणतो, "प्रकाश हा माझा सहजधर्म आहे. माझ्याजवळ प्रकाश नसेल तर काय असेल ? मी प्रकाश देतों हें मला माहीत नाहीं. मी असणें म्हणजेच प्रकाश. प्रकाश देण्याच्या क्रियेचे कष्ट मला नाहींत." सूर्याचें जसें हें प्रकाशदान स्वाभाविक आहे तसेंच संताचें असतें. त्यांचें जगणें म्हणजेच मुळीं प्रकाश देणें. तुम्ही ज्ञानी पुरुषाला जर म्हणालां "तुम्ही महात्मे सत्यवादी आहांत," तर तो म्हणेल, "मी सत्यानें चालणार नाहीं तर दुसरें करू तरी काय ? मी विशेष काय करतों ? ज्ञानी पुरूषाच्या ठिकाणीं असत्यता सभवतच नाहीं."

—विनोबा

# श्री रामकृष्ण व त्यांची सहचारिणी

श्री रामकृष्ण परमहंस यांचें वास्तव्य दक्षिणेश्वर येथें असतां कलकत्ता येथून त्यांचे अनेक भक्त सत्समागम घडावा व अध्यात्मासंबंधीं दोन गोष्टी कानावर पडाव्या या सद्भावनेनें त्यांच्याकडे वेळोवेळीं येत असत. त्यांत कलकत्ता बडाबाजार भागांत रहाणारे कित्येक धनिक मारवाडी व्यापारीही असत. त्यांच्या मनाला कधीं कधीं उपरति होत असे व त्यांची श्रीरामकृष्णावर पूर्ण निष्ठाही जडलेली होती. त्यांत लक्ष्मी–नारायण शेट या नावाचे एक बडे व्यापारी होते. श्री. रामकृष्णांच्या बिछान्यावरील चादर फाटलेली व मळलेली त्यांनीं पाहिली. त्यांना वाईट वाटलें. या देवपुरुषाची कांहीं तरी सेवा आपल्या हातून घडावी ही त्यांची सद्भावना. श्री रामकृष्णांचे कपडेलत्ते, त्यांचें जेवणेंखाणें नीट व्यवस्थींत चालावें ही त्यांची इच्छा. त्या दृष्टीनें कांहीं तरी कायमचा बंदोबस्त करावा हा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला. त्यांच्यानें रहावेना. त्यांनीं मनांतील विचार श्री रामकृष्णासमोर मोठ्या अदबीनें ठेविला.

ते म्हणाले, ‘महाराज! आपले कपडेलत्ते, आपलें खाणें, भोजन वगैरे नित्याचे व्यवहार निर्विघ्नपणें व सहजरीतीनें चालू रहावे असें मला फार वाटतें; आपण माझ्या सुचनेला मान्यता द्या. आपल्यानावें तूर्त दहा हजार रुपये बँकेंत ठेऊन देतों. त्याच्या व्याजांतून आपला नित्याचा घरखर्च होत जाईल. आपण एवढें करण्याची मला परवानगी द्याच.’

श्री रामकृष्ण काय उत्तर देणार? त्यांच्या मनावर फार मोठा आघात झाला! चक्कर आल्यासारखें त्यांना वाटलें! आपल्या मस्तकावर कोणी तरी घाव घातल्यासारखा त्यांना भास झाला. त्यांना तात्काळ मूर्च्छा आली. कांहीं वेळानें शुद्धीवर आले व ते म्हणाल, ‘माते! आतां इतक्या दिवसांनंतर तूं मला संपत्ति मोह्याच्या डोहांत लोटून देऊं पहातेस काय?’

अशा परिस्थितींत भक्त लक्ष्मीनारायण म्हणाले, ‘आपण नका स्पर्श करूं संपत्तीला. मातोश्री शारदामणी देवीच्या नांवावर तरी तेवढीं रक्कम मला ठेऊं द्या.’

‘असं का?’ श्रीरामकृष्ण म्हणाले, ‘ठीक आहे. तिला बोलवा येथें.’

शारदामणी देवींचें आगमन होतांच श्रीरामकृष्ण म्हणाले, 'हें पहा! हे शेटजी दहा हजार रुपये देण्याची इच्छा दर्शवीत आहेत. त्यांचा मी स्वीकार करूं शकत नाहीं. निदान तुझ्या नांवें तेवढी रक्कम ठेवण्याची त्यांची इच्छा आहे. पसंत असेल तर सांग त्याप्रमाणें त्यांना.'

यावर शारदामणीदेवी म्हणाल्या, 'असें कसें होईल? त्या द्रव्याचा मला स्वीकार करतां येणार नाहीं. मी स्वीकार केला काय आणि तुम्ही केला काय, दोन्हीं एकच. मी वेगळी आहें का आपल्यापासून? समजा, मी त्या रुपयांचा स्वीकार केला तरी आपल्या सेवेसाठींच मी त्यांचा वापर करणार ना? म्हणजे ते तुम्हीच घेतल्यासारखें होणार; तेव्हां मीहि त्या रकमेचा स्वीकार करूं शकत नाहीं. स्वीकारापेक्षां जगांत त्यागाचें महत्व भारी आहे. त्यागामुळें लोक आपल्याकडे येतात; तेव्हां त्याचीच कास धरणें हा माझा धर्म आहे.'

'तुझं उत्तर ऐकून मी आतां निश्चित झालों!' श्रीरामकृष्ण म्हणाले.


**लहान मुलाच्या आंकडीवर**

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

***

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

↔

सोल प्रो. जयकर ब्रदर्स
६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १

↔

: स्टॉकिस्ट :
**कांचनलाल वाडीलाल कं.**
दवाबझार, मुंबई २

**अर्नाळकर ब्रदर्स**

**चष्म्यांचे व्यापारी**

आमच्या येथें **डोळयांची मोफत तपासणी** करून शास्त्रोक्त चष्मे वेळेवर तयार करून देण्यांत येतील. सर्व प्रकारच्या फ्रेम्स् व कांचा मिळतील. एकदां आमच्या दुकानीं आल्यानंतर तुम्हीं आमचे कायमचे ग्राहक बनाल.

: मालक :
**बाबूराव अर्नाळकर**
२५५ गिरगांव रोड,
सरकारी तबेल्यासमोर, मुंबई ४

वि. सू:—श्रीसाईभक्तांसाठीं खास सवलतीचे दर

# भाव तसा देव

लेखक : **अनंतराव मराठे,** वेंगुर्लें

आपल्या कित्येक संतांच्या बाबतींत असें दिसून येतें कीं, ज्याचें जें उपास्य दैवत असेल तेंच त्याला इतर दैवतांच्या ठिकाणींहि दिसतें. श्रीविठ्ठल भक्तांना सर्वत्र विठ्ठल दिसत असे. पण श्रीरामदास रामभक्त होते. त्यांना पंढरपूरच्या देवळांतील मूर्ति रामरूप दिसली होती, अशी कथा आहे. बाबांच्या बाबतींतहि असे प्रकार घडत असत.

नाशिकच्या मुळे या नांवाच्या एका गृहस्थाचें उपास्य दैवत 'घोलप' नांवाचे संन्यासी किंवा 'घोलपनाथ' हें होतें. ते बाबांच्या दर्शनास गेले तेव्हां त्यांना मशिदींतील त्यांच्या आसनावर 'घोलप'च दिसले. असें हें दर्शन होतांच—

मग वरती गेले चढोन । निजगुरूचे चरण वंदोन ।।
उभे राहिले कर जोडून । वाचेसी मौन पडियेलें ।। १ ।।
भगवीं वस्त्रें भगवी झारी । घोलपस्वामि देखोनि दृष्टी ।।
धांवोनि पायीं घातली मिठी । उठाउठीं मुळ्यांनीं ।। २।।

त्यानीं तिथें फुलें उधळलीं. साष्टांग नमस्कार घातला आणि वर उठले तों काय? घोलपांच्या जागीं श्रीसाईंची मूर्ति!

'उठल्यावरी डोळे उघडितां । घोलप स्वामीसी अदृश्यता ।।
त्यांचे स्थानीं साई समर्था । दक्षिणा मागतां देखिलें ।।

अशा रीतीनें—

पाहोनि बाबांची आनंदमूर्ति । आणि तयांची ती अतर्क्य शक्ति ।।
तटस्थ झाली चित्तवृत्ति । मुळे निजस्थिति विसरले ।।

पुढें मग त्यांची बाबांवर अतोनात भक्ति बसली.

'तुटला उच्च वर्णाभिमान । पडिलें डोळ्यांमाजी अंजन ।।
भेटतां निजगुरू निरंजन । निधान संपन्न ते झाले ।।

तसेंच दुसऱ्या एका रामोपासक डॉक्टरांना शिरडीला आल्यावर प्रथम श्रीसाईंच्या आसनावर दाशरथी राम दिसले. म्हणून त्यांनीं तात्काळ साष्टांग नमस्कार घातला. पण पुढें वर उठून पहातात तों तिथें बाबा! अर्थात् हे 'योगसंपन्न अवतारी' आहेत, अशी त्यांची खात्री झाली.

याच्या जरा अगोदर नित्याप्रमाणें बाबा लेंडीवर जातांना त्यांनीं बरोबरच्या मंडळीला गेरू बरोबर घ्या म्हणून सांगितलें होतें. त्याचा अर्थ त्यावेळीं कोणाला कळला नव्हता, तो आतां कळला!

# श्रीसाईसच्चरित – गद्यानुवाद

**अध्याय दुसरा**



लें० : **एक साईभक्त**

**श्री** गणेशास, श्रीसरस्वतीस, श्रीगुरुदेवतेस, श्रीकुलदेवतेस, श्रीसीतारामचंद्रास, श्रीसद्‌गुरु साईनाथास मी नमन करितों. मागील अध्यायीं श्रीमंगलाचरण झालें. कुलदैवतास व गुरुंना वंदन झालें. आतां श्रीसाई चरित्र बीज पेरून कार्यास आरंभ करूं या. श्रोत्यांना ग्रंथ प्रवेश सुलभ व्हावा या हेतूनें 'अधिकारी' व 'अनुबंध' या विषयीं निरुपण करून स्पष्टीकरण करूं या.

पहिल्या अध्यायांत यथानुक्रमें गांवाच्या वेशीवर गव्हाचें पीठ पेरून श्रीसाईनीं महामारीचा नाश केला. अशा अगाध साईलीला ऐकतांना मनांत जो आनंदाचा पूर आला, तोच या काव्यरूपानें बाहेर ओझरत आहे. या लीला स्पष्ट करून सांगितल्यास भक्तांस त्या बोधप्रद होऊन त्यांच्या पापांचा नाश करतील, म्हणूनच अतिपवित्र त्याच-प्रमाणें या लोकीं व परलोकीं सौख्यदायक असें हें श्रीसाईचरित्र अत्यंत आदरानें मी लिही-ण्याचें योजिलें असून या कथासूत्रास मी आरंभ करीत आहें. संतचरित्र सन्मार्गदर्शक असतें; नव्हे, जो संत कृपेस पात्र होईल त्यास विचित्र असें कांहींच नाहीं. जो संतसंगीं व संतांच्या कथानिरुपणांत नेहमी निमग्न असतो तो अति भाग्यवान्! म्हणूनच श्रोतेहो, माझी आपणांस नम्र प्रार्थना कीं या आनंदांत आपणही माझ्याबरोबर सहभागी व्हा,

ज्याचा सहवास मला सदोदित घडत आहे, अशा माझ्या नेहमींच्या परिचयाच्या मित्राविषयीं मला दोन शब्द लिहितां येणें अशक्य; तर मग मी संतचरित्र कसें लिहूं शकणार ? जेथें मी माझें स्वतःचें अंतःकरण यथासांग ओळखूं शकत नाहीं, तेथें संत मनांतल्या तरंगांचें तंतोतंत वर्णन मी कसें वर्णन करूं ? गुरुदेवा ! ज्या रुपाचें वर्णन करतां करतां चारही वेद थकले; त्या तुझ्या रुपाचा विचार मला साकल्यानें कसा करतां येईल ? स्वतः संत झाल्याशिवाय संतांना यथार्थ कसें ओळखतां येणार ? तर मग मी पामरानें संतांचें वर्णन कसें करावें बरें ? एकवेळ सात समुद्रांच्या पाण्याची मापणी करतां येईल किंवा आकाशाला गवसणी घालतां येईल; परंतु संतांच्या लीला व बुद्धीसामर्थ्याचा थांग कोणाला लागला आहे ? मी हीनमति क्षुद्र आहें, याची मला पूर्ण जाणीव आहे; तरी पण बाबांचा प्रतापच असा आहे कीं, त्यांचें चरित्र गावयाची माझी लहर अनावर होऊं पाहत आहे.

हे साईनाथा! आपण दीनदुबळ्यांचें विश्रांतिस्थान आहांत. आपल्या अगाध मायेचें वर्णन करतां येणें अशक्य आहे. मी आपला जयजयकार करीत आहें. आपण या दासावर कृपा करावी. आपलें चरित्र मला लिहावेसें वाटतें हें केवढें मोठें साहस मी करीत आहें. मला वाटतें लहान तोंडीं मोठा घांसच मी घेत आहें. आपण माझा उपहास होऊं देऊं नका. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात कीं, जे संतचरित्र लिहीतात त्यांच्यावर भगवंताची कृपा असते. मी जरी अज्ञानी व मूढमति असलों तरी तीच भगवंत मूर्ती माझ्या मनांत प्रेरणा करीत असून या माझ्या कार्याची पूर्तताही तीच करूं जाणें. सर्व स्फूर्ती संतच देत असतात व भक्त हे निमित्त कारण असून ते मनांत जे संकल्प करितात ते सर्व संकल्प संत माऊली स्वतःच पूर्ण करीत असतात. सारांश, श्रीसाई आपलें चरित्र स्वतःच माझ्यासारख्या मूर्खाकडून लिहून घेत आहेत, म्हणूनच या कथेची थोरवी आहे. व तिचा अत्यंत आदरानें गौरव केला जात आहे. साधुसंत वा श्रीहरी कोणाच्याही मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून स्वतःचें चरित्र लिहवून घेत असतात.

शके सतराशेमध्यें महिपतीस स्फूर्ति झाली व संतांनीं आपलीं चरित्रें त्यांच्याकडून लिहवून त्यांची सेवा घेतली, तशीच सेवा शके अठराशेंमध्यें श्रीदासगणूकडून घेतली. आणि त्यांनीं लिहिलेलीं संत-चरित्रें सर्वांना पुण्यपावन झालीं आहेत. महिपतिकृत चार ग्रंथ आहेत. (१) भक्तिविजय, (२) संतविजय (३) संतलीलामृत आणि (४) भक्त लीलामृत. त्याचप्रमाणें दासगणूनीं दोन ग्रंथ लिहिले. एकाचें नांव भक्त ललिामृत आणि दुसऱ्याचें संतकथामृत. या ग्रंथांत उपलब्ध अशा अर्वाचीन संतांचीं चरित्रें गोविलीं आहेत. भक्तलीलामृतांतील तिसऱ्या अध्यायांत श्रीसाईचरित्र वर्णिलें आहे. तें सर्व श्रोत्यांनीं वाचावें. तशीच एक गोड ज्ञानकथा श्रीसाईबाबा एका भक्ताला सांगत आहेत, असें संतकथामृताच्या सत्तावन्नाव्या अध्यायांत आहे. रघुनाथ सावित्री भजन-मालेंत सर्वांना अनुभवाच्या व आनंददायक अशा साईलीला वर्णिल्या आहेत. त्यांतच बाबांच्या एका लेकरास, तहानेलेल्या चकोरावर अमृताचा वर्षाव व्हावा तसा कथामृताचा वर्षाव झाला; त्याचाच आस्वाद आतां श्रोत्यांनीं चाखावयाचा आहे.

दासगणूनीं त्यांच्या स्फूटकवितेंत रसाळपणें वर्णिलेल्या साईलीला ऐकतांना मनाला आल्हाद होतो. त्याचप्रमाणें भक्त अमिदास भवानी मेहता यांनीं गुर्जर जनांकरितां साई चमत्कार कथा मोठ्या प्रेमानें गुंफिल्या आहेत. याशिवाय एक साईभक्त शिरोमणी 'साईप्रभा' या टोपण नांवानें पुण्यांत बाबांच्या कथा प्रसिद्ध करीत आहेत.

अशा सर्व कथा असतांना या ग्रंथाची आवश्यकता आहे कां अशी शंका श्रोत्यांच्या मनांत येणें साहजिकच आहे. श्रीसाई चरित्र म्हणजे एक अनंत व अपार असा रत्नाकर, महासागर आहे. तो माझ्या टिटवीकडून रीता होणार आहे कां? श्रीसाई चरित्र गहन असून, त्याचें पूर्णपणें वर्णन करणें अशक्य आहे. तरीपण जितकें कथन करवेल तितकेंच करून आपण समाधान मानलें पाहिजे.

श्रीसाईकथा अपूर्व व अपरंपार असून, त्या शांतिदायक आणि भवनाशक आहेत. इतकेंच नव्हे तर भक्तांचा श्रवण उल्हास द्विगुणीत करून त्या त्याला मनःस्वास्थ्य देणाऱ्या आहेत. वेळोवेळीं बाबांनीं नानापरीच्या व्यावहारीक उपदेशाच्या, सर्वांच्या अनुभवाच्या, वर्मांच्या आणि निजकर्मांच्या गोष्टी सांगितल्या. श्रुति अपौरुषेय म्हणून विख्यात असून, त्याबद्दलच्या असंख्य आख्यायिका सर्वांना माहित आहेत. त्याचप्रमाणें श्रीबाबांनीं अनेक मधुर आणि अर्थभरीत कथा सांगितल्या, त्या सावधान चित्तानें ऐकतां श्रोता भूक तहान विसरून जातो व त्याला समाधान लाभतें. त्यापुढें इतर सुखें त्याला तृणासमान भासतात. या कथा ऐकतांना कोणाला ब्रह्मसायुज्यता प्राप्त होईल; कोण अष्टांग योगांत प्रविण होईल. तर कोणाला सहज समाधी सुखाचा लाभ होईल. या कथाच अशा आहेत कीं, त्या ऐकणारांचे कर्मपाश तोडून टाकतील. त्यांच्या बुद्धीला तजेला देऊन त्यांना अखंड सुखाची प्राप्ती होईल.

बाबांच्या रसाळ कवितांची एक माला गुंफावी; कारण त्या संग्रह करण्यासारख्या आहेत, अशी मला स्फूर्ति झाली; तसेंच ही एक चांगली उपासना आहे, असेंहि मला वाटलें. बाबासंबंधीं चार अक्षरें कानांत पडलीं तरी साऱ्या चिंता नाहींशा होतात; आणि त्यांच्या कथा भक्तिभावानें ऐकणारा संसार सागर तरून जाईल. माझीच लेखणी करून श्रीबाबा माझा हात गिरवतील. मी मात्र अक्षरें वळवण्याला निमित्त मात्र आहें. वर्षानुवर्षें बाबांच्या लीला पाहून बाबांबद्दलच्या गोष्टी मोठ्या प्रेमानें संग्रहीं करण्याचा माझ्या मनाला एक छंदच लागून राहिला होता. ज्यांना त्यांच्या प्रत्यक्ष दर्शन सुखाचा लाभ झाला नाहीं, त्यांना निदान साईलीला कथा महात्म्य श्रवणाचें पुण्य लाभावें किंवा कोणा सत्भाग्याच्या मनांत या कथा वाचण्याची इच्छा उत्पन्न झाल्यास त्याला परमानंद होऊन अंतीं त्याला समाधान लाभेल, म्हणूनच या कथा ग्रथित करण्याची इच्छा माझ्या मनांत उदय पावली आहे. माझे हे विचार श्री माधवरावांच्या कानांवर मी घातले; परंतु मला हें कसें साधेल या विषयीं मी साशंकितच होतों. माझी साठी उलटलेली, बुद्धि नाठाळ झालेली, शरीरगात्रें ढिलीं पडलेलीं आणि अशावेळीं उरलें काय तर फक्त तोंडाची वटवट; परंतु ही वटवट निरर्थक न होतां निदान ती साईप्रित्यर्थ होऊन त्या योगें कांहींतरी परमार्थ साधला जावा, अशासाठींच हा माझा प्रयत्न आहे. स्वानुभवाच्या अधिष्ठानावरून बाबांनीं वारंवार जे आत्मतृप्तीचे उद्गार काढले, ते श्रोत्यांना सादर करावे ही माझ्या मनींची इच्छा आहे. बाबांनीं अनेक बोधकथा सांगून पुष्कळांना भक्तिमार्गाला लाविलें. त्या सर्व कथा एकत्रित केल्या तर साईगाथा होईल असें माझ्या मनाला वाटतें. त्या कथा जे सांगतात व जे अत्यादरानें श्रवण करतात त्यामुळें उभयतांच्या मनाला पूर्ण शांतीचा लाभ होईल याबद्दल मुळीं शंकाच नाहीं. श्री मुखींच्या कथा ऐकतांना भक्त आपलीं शारिरिक दुःखें विसरून जात व त्यांचे ध्यान, मन, चिंतन करतां त्यांची आपोआप संसार तापांतून सुटका होते. श्रीसाईमुखींच्या गोष्टी अमृताप्रमाणें रसभरीत आहेत. त्या श्रवण करतांना भक्तांना परमानंद होईल. त्या गोष्टींची मधुरता मी किती वर्णन करूं ! अशा या गोड कथा निर्मळ मनानें वर्णन करणारा

जो मला आढळेल, त्याच्या पायानें पुनित झालेल्या धुळींत लोळतां सहज मोक्षप्राप्ति होईल, इतक्या त्या पवित्र आहेत. त्यांच्या कथांची मांडणीच अशी असे व शब्दांची ठेवण इतकी सूचक असे कीं, त्या कथा ऐकतांना श्रोते पूर्णपणें तल्लीन होऊन जात असत व पूर्ण सुखी होत असत. श्रीबाबांच्या गोष्टी ऐकण्यास व त्यांचें दर्शन घ्यावयास ज्याप्रमाणें कान व डोळे उत्सुक होत असत त्याचप्रमाणें त्यांच्या कथा ऐकल्यानें मनाला एकतानता प्राप्त होऊन भक्ताला सहज श्रीसाईचें ध्यान लागतें.

श्रीसाई माझी गुरुमाऊली आहेत. त्यांच्या कथा ज्या ठिकाणीं निघतील, ज्या स्थळीं त्या ऐकावयास मिळतील, त्या सर्व एकत्रित करून प्रेमानें गोठवून ठेऊं या. आणि मग त्या आपण परस्पर लुटून त्यापासून निर्मळ आनंद मिळवूं या. यांत माझें कांहींच नाहीं. ही सर्व श्रीसाईबाबांचीच प्रेरणा आहे. ते वदवतील तसें मी बोलणार. मी असें बोलतों हाहि अहंकारच आहे. श्रीसाई स्वतः सूत्रधार आहेत. तेच माझ्या वाचेला प्रेरणा देणार व माझ्याकडून वदविणार. मी कोण बोलणार! भक्तानें त्याचा 'मी' पणा बाबांच्या पायावर समर्पण केल्यास त्यास सुख लाभेल आणि त्याचा अहंकार गेल्यावर त्याचा संसार सुखाचा होईल.

अशा वृत्ति माझ्या मनांत उठल्या खऱ्या, पण बाबांना विचारण्यास मला धीर झाला नाहीं. इतक्यांत श्री माधवराव मशीदीचे म्हणजे द्वारकामाईचे पायरीवर आलेले दिसले. माझे विचार मी त्यांचे कानावर घातले. त्या वेळीं आजूबाजूस कोणी नसून बाबा मशिदींत एकटेच आहेत असें पाहून श्री माधवरावांनीं बाबांना विचारलें, 'बाबा, हे अण्णासाहेब म्हणतात कीं, आपली परवानगी असल्यास आपलें चरित्र यथार्थ लिहावें, असें त्यांच्या मनांत येत आहे. त्यावर बाबा म्हणतात, 'अरे! मी तर एक भिकारी आहें. मी दारोदार भिक्षा मागत फिरतों व मिळेल ती ओली कोरडी भाजी भाकरी खाऊन माझी मी गुजराण करतों हें तुला माहीत आहे ना? तर मग माझी कथा कशाला? नको. तें उपहासास एक कारण होईल. असें म्हणूं नका कीं या हिऱ्याला कोंदणी जडविला पाहिजे.' असो. बाबांची आज्ञा. त्यांचें सहाय्य असल्याशिवाय मी कसा लिहूं शकणार! त्यांचें चरण माझी सर्व संकटें दूर करणार असून या कथा लिहवून घेणार आहेत. संतांच्या आशीर्वचनानेंच ग्रंथरचनेचा उपक्रम होत असतो. आपण जर कृपादृष्टीनें मजकडे पाहिलें नाहीं तर माझें लिखाण निर्विघ्नपणें कसें पार पडेल? असे विचार माझ्या मनांत चालले होते. श्रीसाई समर्थांनीं माझें मनोगत ओळखलें, त्यांच्या मनांत माझ्याविषयीं कृपा उपजून त्यांनीं म्हटलें, 'जा, तुझे मनोरथ पूर्ण होतील.' असें त्यांनीं म्हणतांच मीं माझें मस्तक त्यांचे पायावर ठेविलें. मला उदीचा प्रसाद देऊन श्रीसाईनीं माझ्या डोक्यावर आपला वरदहस्त ठेविला. श्रीसाई सकलधर्म विशारद असून भक्ताचें भय नाहींसें करणारे आहेत. श्रीमाधवरावांची विनंति ऐकून श्रीसाईनाथांना माझी करुणा आली. त्यांनीं माझ्या अधीर मनाचें सांत्वन करून मला धैर्य दिलें.

(अपूर्ण)

# संत–वाणीचे अमोल बोल

## लेखांक २

( २ ) 'God Speaks to the **heart**, when the **brain** cannot understand Him!

'**पिंडीं ते ब्रम्हांडीं**' असें एक वेदांत सूत्र आहे. याचा सरळ आणि सोपा अर्थ, या विश्वव्यापी जगाचें जें विराट स्वरुप दृग्गोचर होतें, त्याची निर्मिती सूक्ष्मांतून आहे, आणि तीही उत्क्रांति–तत्वावर आधारलेली आहे. तसेंच, हा उत्क्रांति सिद्धांत ( Evolution Theory ) वनस्पती–जीवनाला तसाच प्राणी जीवनालाही सारखाच लागू असून, त्यांतूनच अखिल विश्वव्यापी जगाची उत्पत्ति आहे, हें त्रिकालाबाधित सत्य विज्ञान–शास्त्रानें शाबीत झालें आहे!

'आधीं बीज एकलें। बीज अंकुरलें, रोप वाढलें। एका बीजा पोटीं,

तरु कोटिकोटी। जन्म घेति सुमनें फळें।' या उक्तीच्या आधारें, सूक्ष्म बीजांतून रोपटें, त्यांतून गगन भेदी वृक्ष, हे जसें वनस्पती–जीवनांत तद्वत फक्त सूक्ष्मदर्शक यंत्रांतूनच दृश्यमान होणाऱ्या एकपेशी सूक्ष्म जीवबिंदू (Amoeba) तून जलांत जलचर मत्स्य, हवेंत पक्षी आणि भूमीवर सरपटणाऱ्या जीवजंतूपासून तों चतुष्पादी पशूपर्यंत–अर्थात त्यांतून पुढें वानराचा नर–अशी ही उत्क्रांत स्वरूपांत दृश्यमान होणारी **विश्वव्यापी जीवसृष्टी**—

ही कुणी निर्माण केली? देवानें!–असें भावभक्तीनें मानणारे ते आस्तिक आणि भोंदू संतमहंतांच्या आणि ढोंगी पोटभरू भटाभिक्षुकांच्या डोक्यांतील हा एक काल्पनिक शोध असें मानून त्यांचें अस्तित्वतच नाकारणारे आणि 'I challenge Mr. God' म्हणणारे पाखंडी पढित, ते नास्तिक.

या तथाकथित आधुनिक सुशिक्षित पंडितांनाच देव–दर्शन कसें होईल? हें अचुक मार्गदर्शन करणारी, संत अरविंदबाबूंची ही वरील उक्ति आहे.

या उक्तीचा अर्थ बुद्धीला देव प्रतीत होत नाहीं म्हणून भावनेला आवाहन असा नाहीं. बुद्धीनेंही तो प्रतीत होतो. किंबहुना मानवाच्या इतर सर्व इंद्रियांचे व्यापार बुद्धीच्या द्वाराच होतात तसा बुद्धीच्या मार्गेंच देव दिसणार–पण केव्हां? हृदयाची संवेदना बुद्धीला भिडते. म्हणूनच हृदयाला आवाहन.

अरबिंदबाबूंची ही उक्ति मी वाचली, आणि मला, महात्माजींच्या एका प्रसिद्ध उक्तीची आठवण झाली, आणि त्या दोहोंत एका दृष्टीनें मला साम्य आढळलें. ती उक्ति

अशीं–'महाराष्ट्रांत बुद्धि आहे, पण श्रद्धा नाहीं.' महात्माजींचा विषय राजकारण आणि अरविंद बाबूंचा विषय वेदान्त–अध्यात्म! अर्थात व्यावहारिक दृष्ट्या त्यांत वेगळेपणा असला तरी अध्यात्मिक बाबतींत एकप्रकारें साम्यच आहे. महात्माजींच्या उद्गारांतील बुद्धीचें उगमस्थान मेंदूंत ( Brain ) मध्यें आहे आणि श्रद्धेचें स्थान हृदय ( heart ) हें आहे. भावना हृदयांत आणि पांडित्य मेंदूंत असतें. स्वराज्याचें ध्येय गाठायला जशी अंतःकरणांत श्रद्धा हवी तशी देव भेटायलाही अंतःकरणांत भावभक्ती हवी. नुसतें बुद्धीचें पांडित्य विफल!

एवंच, देव कुणाला दिसेल? भावाचा भुकेला जो देव, तो भक्ताच्या ठायीं भाव असेल तरच दिसेल! हृदयाची संवेदना जर बुद्धीच्याद्वारा डोळ्यांना भिडली तरच डोळ्यांच्या बुबुळांतून देव दिसेल, एरव्हीं दिसणार नाहीं. प्रल्हादानें त्या दृष्टीनें पाहिलें त्याला देव दिसला, पण त्याचा बाप हिरण्यकश्यप कीं ज्याचें हृदय निर्विकार–शून्य, आणि डोकें आणि दृष्टी मदांध, त्याच्या डोळ्यांच्या कवटींतून त्याला देव दिसावा कसा? तो प्रल्हादाला ओरडून म्हणाला, 'बोल, कुठें आहे तुझा देव? या–इथं? इथं?' असें म्हणून त्यानें दरवाजाला एक लाथेची ठोकर दिली आणि विचारलें– 'इथं?' तो म्हणाला 'होय.'–तोंच, दरवाजा फुटून त्यांतून नारसिंहाच्या रुपानें देव प्रगट झाला! पण बाळ प्रल्हादाचें हें सामर्थ्य, इतर सामान्य माणसांना कुठून असणार? ते असेंच म्हणणार व म्हणतातहि कीं जें आमच्या चर्मचक्षूंना प्रत्यक्ष दिसत नाहीं, त्याचें अस्तित्व आम्हीं मान्य करीत नाहीं. बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर, याच भाषेंत ते असेंच म्हणणार कीं, तुझा देव दाखव नाहींतर त्या तुझ्या देवाचें श्राद्ध कर.

असाच माझ्या एका पाखंडी–तरुण मित्रानें मला सवाल केला—'जो देव मी पाहिला नाहीं तो दिसे तों मी त्याचें अस्तित्व कां मानावें?'

'तो दिसायला हवा म्हणून,' मी म्हणालों. 'पण तें जाऊं द्या; मला सांगा टेम्स नदीच्या कांठीं लंडन शहर आहे. तिथें वेस्ट मिनिस्टर ॲबे आहे, हें खरें कीं खोटें?'

'खरें.'

'तूं स्वतः हें पाहिल आहेस?'

'नाहीं.'

'मग याचें अस्तित्व तूं मानतोस?'

'हो—'

'कां?'

'ज्यानीं तें पाहिलें आहे त्यांच्या शब्दावर माझा विश्वास आहे म्हणून.'

'आतां सांग, तुझे वडील तूं दोन महिन्यांचा असतांना वारले. तूं त्याना पाहिले होतेंस?'

'नाहीं.'

'मग, तुला वडील होते हें तूं मानतोस?'

तो चिडला आणि म्हणाला— 'हो मोठाच शहाणा आहेस. वडिलाशिवाय क मी जन्माला आलों?'

'पण तूं त्यांना पाहिलं नाहींस ना?'

'कशाला पहायला हवें? माझी आई त्यांच्या नेहमीं आठवणी सांगते.'

'होय ना? मीही तेंच म्हणतों. अनुमान प्रमाण अगर आप्तवाक्य प्रमाण मानून कांहीं गोष्टींचें अस्तित्व खरें मानायला हवें ना? तसेंच देवाचें अस्तित्व. आतां मला सांग, या बृहन्मुंबईत, आगगाड्या, ट्रॅम, कारखाने, गिरण्या, मोटार, बसगाड्या ज्या विद्युत शक्तीनें चालल्या आहेत—तो कारखाना तूं पाहिला आहेस? नाहीं ना? तरीही त्या विद्युत शक्तीचें अस्तित्व तूं मानतोस—मग सर्व सृष्टींचा हा पसारा, हे चंद्र सूर्य तारे, त्यांचे उदयास्त, भरती—आहोटी, पर्जन्य हा सर्व विश्वव्यापी व्याप ज्या शिवशक्तीनें चालतो—तीच शिवशक्ती—'

'देव होय?' तो मध्येंच म्हणाला, 'झूट, त्याला आम्ही निसर्ग म्हणतों.'

'मग ज्याला तुम्ही निसर्ग म्हणतां तोच देव म्हणा हवा तर!' मी उत्तरलों. आणि माझ्या विधानाच्या समर्थनार्थ मी बाबू अरविंदांची एक उक्ति देऊन संतवाणीचा आधार दिला—'God is the reverse side of Nature and Nature is the obverse side of God.' आपण एक नाणे घेऊं, त्या नाण्यावर एका बाजूस राजाराणीचा अगर हल्लीं आमच्या नाण्यावर अशोकस्तंभाची मुद्रा आहे. ही मुखवट्याची बाजू समोर धरली म्हणजे ती त्या नाण्याची odverse side—दृष्टीला दिसणारी बाजू पण ही एक बाजू म्हणजेच नाणं नव्हे, त्याच्या उलट बाजू असतेच ती त्याची Reverse side उलटी बाजू, या दोहों मिळून तें नाणें—तद्वत् निसर्ग कुणी म्हणो, कुणी देव म्हणो, या विश्वाचें सूत्र चालकत्व या उभय बाजूंच्या शिवशक्तींत आहे. हा साधा समन्वयहि त्याच्या हटवादी पाखंडी स्वभावाला पटेना. 'त्याचा येळकोट राहीना—मूळस्वभाव जाईना!'

या पाखंडी माणसाचें संत तुकोबा महाराजांनीं आपल्या एका अभंगांत सुंदर वर्णन केलें आहे. त्या अभंगाचा प्रथम चरण असा—

'**जीव तोचि देव। भोजन** ते **भक्ति**। मरण ते मुक्ति। पाखंड्याची।' आणि बरोबरच आहे. तुकाराम महाराजांचा दुसरा एक अभंग आहे—'तुझें आहे तुजपाशीं' या संतवाणीनुसार त्याच्या बुद्धीनें (Brain) ठरवलें कीं माझा देव आहे माझ्यापाशींच; बाहेर कशाला शोधायला जायला हवें? माझा आत्माराम हाच माझा देव आणि माझी भक्ति भोजन, आणि मुक्ति मरण पण तो विसरला. कीं याच अभंगाच्या दुसऱ्या चरणांत आहे. परि तूं जागा चुकलासी। देव शोधायची तुझी जागा मेंदु (Brain) नव्हे हृदय (heart) होय. एकनाथ महाराजानीं म्हटलें आहे 'भावें भक्ति कळे। भावें देव मिळे। आणि याच भावभक्तीचें उगम स्थान हृदय अर्थात्—

'हृदयांत जो असेल। देव तो दिसेल
भक्तिभावें शोधा। तिथेंच तो मिळेल'

—प्रा. **आबा शेट्ये** (गोरेगांव)

---

# साधन नामचि सार

## उत्तरार्ध

कोणतीहि गोष्ट असो, ती यशस्वी व फलदायी व्हायची असेल तर आपणांस शिस्तीचें व योजनाबद्धतेचें सहकार्य मिळवावें लागतें. तो नियम नामजपालाहि लागू आहे.

कलियुगांत सर्व दुःखांवर रामबाण उपाय म्हणजे नामसंकीर्तन होय हें गेल्या अंकीं विशद करून सांगिल्यानंतर तें योजनाबद्ध असावें; पद्धतशीर असावें म्हणजेच त्याचें अपेक्षित फळ कसें मिळतें, याचें विवरण या लेखांत करावयाचें आहे. कोणतीहि गोष्ट असो; ती शिस्तीनें व योजनाबद्धतेनें केली असतां ती यशस्वी ठरते, हा नियम नामसंकीर्तनाच्या बाबतींतहि लागू आहे.

आणि यासंबंधीं विशेष विवरण कलिसन्तरणोपनिषदमध्यें करण्यांत आलें आहे. नारदमुनी पृथ्वी पर्यटणासाठीं निघाले असतां कलीयुगामध्यें मी पर्यटण यशस्वी रीतीनें कसें संपवूं असा प्रश्न त्यानीं ब्रह्मदेवास केला असतां ब्रम्हदेव म्हणाले, 'नारदमुने! आपण फार चांगला व प्रासंगिक महत्वाचा प्रश्न विचारला. कलियुगांत पदोपदीं व घडोघडी मानवांकडून पातकें घडत असतात. हे पातकांचे डोंगर जमीनदोस्त करणारें सर्वोत्तम साधन म्हणजे देवाच्या नावाचें चिंतन, नामस्मरण हेंच होय.'

नारदमुनीनीं विचारलें 'असा तो नाममंत्र कोणता कीं ज्याच्या सहाय्यानें मनुष्याला पुण्यसंचय करतां येईल व पापांच्या राशींचा क्षय करतां येईल ?'

सर्व पातकांचा नाश करणारा, सर्वांना सहजसाध्य व सर्वांच्या आटोक्यांत येणारा असा सोळा अक्षरी नाममंत्र ब्रह्मदेवानीं नारदाला सांगितला, तो कोणता ?

**हरे राम हरे राम राम राम हरे हरे।**
**हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥**

या सोळा अक्षरी नामश्लोकाचा भक्तिभावपूर्वक सतत जप केल्यानें साऱ्या पातकांचा नाश होतो. इतका सुलभ, साधा उपाय साऱ्या शास्त्रांत व वेदांत कुठेंही आढळणार नाहीं. हा सर्व दुःखांवर एक महान तोडगा आहे.

यावर नारदमुनीनीं अधिक खुलासा करून घेण्याच्या हेतूनें विचारलें कीं, 'या नामस्मरणाचा कांहीं विधि असलेच कीं नाहीं ? तो कृपा करून सांगा.'

'याला विधीबिधी कांहीं नाहीं. शुद्ध असा अशुद्ध असा; प्रेमानें व भक्तिभावानें जो कोणी या नाममंत्राचा जप करील त्याला मोक्षाची सारीं दारें खुलीं झालेलीं असतील. होय; या नाममंत्रासंबंधीं आणखी सांगण्यासारखें कांहीं आहे. तेंहि गुह्यांतील गुह्य मी सांगून टाकणार आहें. तें कोणतें? या शोडष अक्षरीं नामांचा जो कोणी साडेतीन कोटी जप करील तो, त्यानें कितीहि भयंकर पापें केलेलीं असो, त्यांतून मुक्त होईल. हा जप करणारा कोणत्याहि जातीचा असो, स्त्री असो वा पुरुष असो, त्याची सर्व पापांतून मुक्तता होईल व त्याला ईश्वर प्राप्ती होईल. किती सोपा उपाय आहे हा! परंतु त्याचा विचार कोण करतो आहे?

या नामजपासंबंधीं व त्याच्या यशस्वीतेसंबंधीं कांहीं साधे नियम आहेत. ते अंमलांत आणण्यासाठीं झटणें जरूर आहे. नामजप किती झाला याची गणती होणें इष्ट आहे. त्यासाठीं आपण स्वतःवर कांहीं बंधनें लादून घेतलीं पाहिजेत. साडेतीन कोटी नाम जपाचें जें फळ मिळावयाचें तें किती तरी श्रेष्ठ व सर्वदा वांछनीय आहे. रोज सरासरी ६५०० मंत्रजप करावा तेव्हां कुठें पंधरा वर्षांच्या कालावधींत साडे तीन कोटी जपसंख्या पूर्ण होणार हें आपण नेहमीं लक्षांत बाळगलें पाहिजे.

ईश्वर प्राप्ति ही साधीसुधी का गोष्ट आहे? कित्येक जन्मांचें पुण्य खर्ची घालावें, नाना प्रकारचे कष्ट सोसावे, व नाना सायास करावे तेव्हां कुठें तें भाग्य वाट्यास आलें तर यावयाचें आणि त्या मानानें हें नामजपाचें साधन किती सहज साध्य आहे बरें?

थोडीशी धनदौलत मिळावी यासाठीं आपण किती आयास सायास करतों! किती अभ्यास, किती धडपड करतों आणि रक्त आटवितों! आणि ज्याच्या सहाय्यानें तुम्हांला परमार्थाची, श्रेष्ठांत श्रेष्ठ धनाची व सर्व सुखसंपदेची प्राप्ति होऊं शकते, त्यासाठीं तुम्हीं थोडे तरी नियमबद्ध व्हायला नको का?

रोजच्या रोज एवढ्या प्रमाणांत नामजप कसा पार पाडतां येणार? ही काळजी तुम्हांला वाटते का? त्याच्यासाठीं केवळ ठराविक वेळीं ठराविक घटका, तासच खर्च केले पाहिजेत असें नाहीं. तुम्हीं कुठेंही असा; कामधंद्यांत असा कीं प्रवासांत असा. चालतां, बोलतां फिरतां व उद्योगधंदा करतां या कर्तव्याची आठवण आपण ठेविली पाहिजे. आपला रोजचा दिनक्रम लक्षांत आणा. रोज वायफळ गप्पाष्टकांत, निष्पळ बडबड करण्यांत, नसत्या उचापती करण्यांत व दुसऱ्यांची अकारण निंदा करण्यांत आपण आपला किती अमूल्य वेळ वायां दवडींत असतों बरें? या कार्यक्रमाला आपण निर्धारपूर्वक छाट दिली पाहिजे. म्हणजे पहा आपणास या सत्कार्यासाठीं किती वेळ मिळतो तें!

---

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा




( आक्टोबर १९५९ )

भक्तांची गर्दी नेहमींप्रमाणें वाढत्या प्रमाणांत चालू आहे. सध्यां हवामान ठीक आहे. ऑक्टोबर महिन्यांत मुंबईतील व इतर ठिकाणच्या अनेक कलावंतांनीं तसेंच गायनवादनकारानी आपआपल्या कलेची श्रीसाई समाधीपुढें भक्तिभावपूर्वक हजेरी देऊन आबालवृद्धांचें मनोरंजन केलें. कीर्तन प्रवचनादि कार्यक्रमहि अनेक झाले.

**थोरामोठ्यांच्या भेटी** :– या महिन्यांत पुण्यतिथोत्सवानिमित्त व इतर दिवशीं अनेक थोरा मोठ्यांनीं शिरडींत येऊन श्रीसाईबाबांच्या दर्शनाचा लाभ घेतला. त्यांत विशेष उल्लेखनीय म्हणजे भारतीय राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष श्रीमती सौ. इंदिरा गांधीं ह्या दौऱ्यावर असतां श्री साईबाबांच्या दर्शनास आल्या होत्या. त्यांनीं श्रीचा प्रसाद ग्रहण करून समाधान व्यक्त केलें.

## शिरडींत येणाऱ्या श्रीसाईभक्तांची सोय.

**शिरडींत श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं येणाऱ्या भक्तांबरोबर पैसा अडका किंवा कांहीं मौल्यवान् वस्तू असल्यास पुष्कळ वेळां त्या जवळ बाळगाव्या लागतात व त्यामुळें चोरांचें तसेंच खिसेकापूंचें फावतें. त्या बंदोबंस्ताने ठेवतां याव्या या हेतूने संस्थान समितीने गोद्रेज कंपनीकडून खास लोखंडी कपाटें करवून घेतलीं आहेत. प्रत्येक खणास रोजीं फक्त चार आणे भाडें ठेवण्यांत आलें आहे, तरी भक्तांनीं या सोयीचा जरूर फायदा घ्यावा अशी विनंती आहे.**

## श्री साईनाथ कै. अण्णासाहेब दाभोळकर वाचनालय

शिरडी येथें येणाऱ्या साईभक्तांसाठीं व गांवांतील आबालवृद्धांसाठीं स्थापन झालेल्या या वाचनालयाची व ग्रंथालयाची उत्तरोत्तर वाढ होत चालली आहे. या वाचनाल्यांत मराठी, इंग्रजी, कानडी, हिंदी वगैरे निरनिराळ्या भाषांतील धार्मिक व अध्यात्मिक ग्रंथ ठेवण्यांत आले असून मासिकें, साप्ताहिकें व दैनिक पत्रेंहि ठेवण्यांत आलीं आहेत. या वाचनालयाची व्यवस्था नीट रहावी व त्याला उदात्त स्वरूप यावें, त्याचप्रमाणें जास्तींत जास्त लोकांनीं त्याचा उपयोग करून घ्यावा यासाठीं वाचनालयाचे व्यवस्थापक शक्य तेवढी मेहनत घेत आहेत.

गेल्या कांहीं दिवसांत या वाचनालयाकडे भेटदाखल आलेलीं पुस्तकें:—यू. एस. आय. एस. इंटर नॅशनल मुंबई–२० इंग्रजी पुस्तकें, श्री. एन्. यु. बोरतकर, मुंबई–८ इंग्रजी पुस्तकें, डॉ. पी. रुस्तुमजी शिरडी–गीता प्रवचने (इंग्रजी), श्री. वाय. बी. सोनार, शिरडी–गीता–माता (हिंदी) श्री. पु. बा. कुलकर्णी–ना. नाना शंकरशेट यांचें चरित्र (मराठी), श्री. चकोर आजगांवकर–माणुसकीची जखम (मराठी) श्री. नारायण पवार (शिरडी) –शुभा (मराठी), श्री. वि. ल. महाजन–आत्मबोध.

याशिवाय पुढील मासिकें श्रीसाई सुमन (गुजराथी) श्री. शंकरलाल चोकशी, श्रीसाई सुधा (इंग्रजी) ऑल इंडिया साईसमाज, मद्रास, संजय (मराठी) श्री. चंद्रकान्त नागेशराव सावंत, मुंबई यांजकडून भेटीदाखल येतात, राष्ट्रवाणी (गुजराथी) हें साप्ताहिक श्री. रमणीकलाल एन्. सरैय्या, मुंबई यांजकडून येतें.

संस्थान समिति या सर्वांची आभारी आहे. ग्रंथरूपानें वाचनालय समृद्ध करण्यासाठीं सर्वांनीं झटावें अशी विनंती आहे.

## दिवाळी अंकांची भेट

या वाचनालयास मुंबई, पुणें, शिरडी वगैरे ठिकाणच्या सुमारें चौतीस श्रीसाई-भक्तांनीं वेगवेगळे दिवाळी अंक भेटीदाखल दिले. स्थलाभावीं या अंकीं नावांची यादी प्रसिद्ध करतां आली नाहीं याबद्दल दिलगीर आहोंत. संस्थानसमिती त्या सर्व दात्यांची आभारी आहे. शिवाय असंख्य वाचकांनीं विविध प्रकारच्या दिवाळी अंकांची सुग्रास मेजवानी दिल्याबद्दल त्यांना समाधानपूर्वक दुवा दिला असेलच.

●

**आरंभापासून इंग्रजी शिका व एस्. एस्. सी. पास व्हा**

पाळी बदलणाऱ्या गिरणी–कामगारांना व सर्वांस सोयीस्कर अशा सकाळ-संध्या-काळच्या वेगवेगळया बॅचिस्. दुपारचे स्त्री–पुरुषांचे वर्ग त्वरित भेटा किंवा लिहा.

**विश्वभारती क्लासेस**

गणेश वाचनालय, रानडे रोड एक्स्टेन्शन, पोपटलाल बिल्डिंग,
नं. २ समोर, दादर (बी. बी.) मुंबई २८

# श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या

माहे जानेवारी ( १९५९ ) ते नवंबर १५ ( १९५९ ) या अवधींत मुंबई कचेरींत रु. ५० व त्याहून अधिक मिळालेल्या देणग्यांची साभार पोच पुढें देण्यांत येत आहे.

## इमारत फंड

| | | |
|---|---|---|
| मे. गोल्ड सोप फॅक्टरी | मुंबई | ३९०—०० |
| श्री. जे. जे. के. पटेल | ,, | ८२—०० |
| ,, सी. व्ही. साखळकर | पुणें | १००—०० |
| ,, के. सी. पटेल | मुंबई | ४२०—०० |
| ,, एच. एन. पटेल | नैरोबी | १०१—०० |
| ,, एम. के. अहुजा | साटना | २०००—०० |
| ,, ए. डी. मिस्त्री | मुंबई | ७०—०० |
| ,, द. दा. रासने | पुणें | ५०—०० |
| मिसीस. इं. श्रॉफ ( ३५+३५+३५ ) | मुंबई | १०५—०० |
| श्री. एन. लॉयर ( इस्पीतल+कोठा ) | ,, | १०५—०० |

## हॉस्पिटल फंड


| | | |
|---|---|---|
| ,, मेहरू पी. सिधवा | मुंबई | ८१—०० |
| ,, पेरीन पी. सिधवा | ,, | १२०—०० |
| डॉ. जी. आर. वझे | पुणें | १०१—०० |
| श्री. बी. बी. दवे | मुंबई | १०१—०० |
| ,, एन्. नरसिंहराव | मसलीपट्टम | ९०—०० |
| ,, पी. डी. ओक | कोल्हापूर | १२००—०० |
| ,, सी. व्ही. साखळकर | पुणें | १००—०० |
| ,, एम्. जी. शहा | एडन | २०००—०० |
| डॉ. अॅ. मिसेस सी. जी. पटेल | कम्पाला | १५१—०० |
| श्री. व्ही. एच्. पटेल | सालसबरी | ६६—२५ |
| ,, के. व्ही. मेहता | मुंबई | ३२०—०० |
| ,, ए. एस्. वैद्य | ,, | १५०—०० |
| ,, टी. सिद्दारेड्डी | चिन्नागोट्टीगल्ल | ५०—०० |
| ,, एम्. बी. पटेल | मुंबई | १२५—०० |
| श्री. के. के. के. नंबीया | मद्रास | ३७५ |
| ,, ए. डी. मिस्त्री | ,, | ७० |
| ,, एफ्. के. मेहता | अहमदाबाद | १०१ |
| ,, के. सी. सातारावाला | सातारा | ५१ |
| सौ. शिला पेंडसे | मुंबई | ९० |
| श्री. शां. ना. पराशरे | ,, | १०१ |
| सौ. इंदिराबाई दांडेकर | धामतरी | १०१ |
| ,, एम्. बी. परेल | मुंबई | २५० |
| ,, जे. जे. दास | ,, | २०१ |
| ,, आर. एस्. रावळ | ,, | १०१ |

## कोठी फंड

| | | |
|---|---|---|
| श्री. एन्. सेठना | मुंबई | १२४ |
| ,, के. रामचंद्रन् | मद्रास | ३४३ |
| ,, एम्. ए. नारायणराव | पुणें | ५० |
| ,, व्ही. पी. सुगंधी | ,, | ६६ |
| ,, वाय. व्ही. सुमथी | गुंतुर | ५० |
| ,, बी. एम. पटेल | मोम्बासा | ५० |
| ,, के. एम. परमार | लुसाका | १३५–५० |
| मिसीस. आर. माधवन | मद्रास | ५५ |
| श्री. ए. डल्ब्यु. राजे शिरके | बडोदा | ३०० |
| ,, ए. डी. राजेशिर्के | ,, | ३२५ |
| सौ. सुमतीबाई पवार | ,, | ४२५ |
| श्री. एम. ए. लक्ष्मण | वॉशिंग्टन | १२० |
| ,, पी. कुमार | मुंबई | ८० |
| मे. डिझेल इंडिया | ,, | १००० |
| श्री. जी. आर. कचकुरा | औरंगाबाद | ५१ |
| डॉ. आर. श्रीनिवासराव | जगय्या पेटा | १०० |
| श्री. एस. बेन्जामीन | मुंबई | १०१ |
| ,, पी. सोमसुंदर | हैद्राबाद | १२१ |
| ,, व्ही. आर. पंडित | दिल्ली | ५१ |
| श्री. आर. एल. आगरवाल | मसुरी | १०० |
| मिसीस लीलाबेन पटेल | इन्डोला | ७२–८८ |
| श्री. व्ही. डी. पटेल | ,, | ५३ |
| ,, एम्. डी. पटेल | ब्रोकनहील | ६६–२५ |
| ,, के. बी. नायक | लिंडी | १५५ |
| ,, के. पी. शास्त्री | इनडोलना | ६६–२५ |
| ,, सि. व्ही. कृष्णमूर्ति | तिरुपति | १०५ |
| ,, एन. आर. हरिदास | कुवाईट | १०० |
| ,, एस. बी. देव | ठाणें | १८० |
| ,, पी. के. पंडीत | मुंबई | ५१ |
| ,, आर. नाईक | नैरोबी | ५१ |
| ,, एम्. बी. पटेल | मुंबई | १२५ |
| ,, व्ही. एम. पटेल | सॅलसबरी | ६६–२५ |
| मे. मिस्त्री अँ. कं. | लुसाका | ७० |
| ,, आर. गोपीनाथ | बंगलोर | १४५–०० |
| मे. परेख अॅन्ड कं. | मुंबई | १३१–२५ |
| श्री. जी. एम्. देशपांडे | नागपूर | १०१–०० |
| ,, ए. डी. प्रधान | कुवाईट | १५०–०० |
| ,, आर. सी. देसाई | न्यु दिल्ली | १८१–०० |
| ,, आर. जी. पटेल | इन्डोला | ७५–०० |

| | | |
|---|---|---|
| श्री. के. एस्. देसाई | कम्पाला | १४५–०० |
| मे. गीवी ट्रेनिंग कं. | दुबई | ५१–०० |
| श्री. डी. कटारी | न्यु दिल्ली | ५०–०० |
| ,, पी. आर. हरीहरन् | मुंबई | १००–०० |
| डॉ. एस्. आर. कित्तूर | कोल्हापूर | ५१–०० |
| श्री. टी. नंबियार | मद्रास | ६५–०० |
| ,, डी. आर. पटेल | कम्पाला | ४९–६९ |
| ,, टी. डी. राव | मुंबई | ५०–०० |
| डॉ. मिसेस सी. जी. पटेल | कम्पाला | १००–०० |
| मे. पटेल ॲण्ड कं. | मुंबई | ५१–०० |
| श्री. व्ही. सी. कापडीया | ,, | ५१–०० |
| श्री. एम. वाय. देसाई | मुंबई | ५०–०० |
| ,, बी. व्ही. मुंडकुर | ,, | १००–०० |
| ,, एम. आर. चव्हाण | ,, | ५०–०० |
| श्रीमती सुमित्राबेन | ,, | ५१–०० |
| मे. गोल्ड सोप कं. | ,, | १७३–०० |
| श्री. एन. एम. पटेल | ,, | ५१–०० |
| ,, एफ. एन. मादन | ,, | १४६–०० |
| ,, एस. आर. कल्याणी | ,, | ६०–०० |
| ,, बी. टी. मरचंट | ,, | ५१–०० |
| ,, डी. डी. नेरॉय | ,, | १२७–४० |
| ,, आर. सी. अंक्लेसरिया | कोटाह जं. | १११–०० |
| ,, ए. डी. मिस्त्री | मुंबई | ६०–०० |
| ,, हिरा के. पुरुषोत्तम | ,, | ७७–०० |
| ,, जे. एच. पटेल | ,, | ५१–०० |
| ,, के. एम. कनकिया | ,, | ३०३–०० |
| ,, एफ्. बी. मेजर | ,, | ९३–०० |
| ,, ए. यु. शहा | ,, | १०१–०० |
| ,, एन्. एम्. शहा | ,, | १०१–०० |
| सौ. एल्. आर. देशमुख | पुणे | १०१–०० |
| श्रीमती पार्वतीबाई देवस्थळी | मुंबई | ५५–०० |
| श्री. बी. ए. मिस्त्री | ,, | ५१–०० |
| श्रीमती अमिनाबाई | ,, | ८१–०० |
| श्री. व्ही. एस्. देशपांडे | डोंबिवली | १००–०० |
| ,, बी. बी. पालव | मुंबई | १०८–२५ |
| ,, मनाल्डीया | ,, | ७७–०० |
| ,, के. एम्. वर्तक | ,, | १०१–०० |
| ,, लुहार टप्पु पुरुषोत्तम | ,, | ५१–०० |
| ,, ए. एम्. बोरकर | धारवाड | १०१–०० |

स्थापना १९१६



श्री

साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते !

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सॅंडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं तयार केलेले श्री साईबाबांचें तीन रंगी चित्र, द्वारकामाई व इतर एक रंगी फोटो—साईज १० × ८, १० × १४, १४ × २० व पोस्टकार्ड साइज खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री. सगुण मेरु नाईक
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर

मुद्रक : कृ. ना. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : ना. अं. सावंत, ईस्ट अँन्ड वेस्ट इन्शुअरन्स बिल्डिंग, ४९/५५, आपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.